MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष अठरावे/अंक १०/ऑक्टोबर २०१७

## संपादकीय

### शिक्षण स्वातंत्र्य - एक संशोधनाचा विषय

पाटना विद्यापीठाला १०० वर्षे पुरी झाल्याच्या निमित्ताने झालेल्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतातील उच्च शिक्षणाच्या दर्जाबद्दल खंत व्यक्त केली. तक्षशिला, नालंदा, विक्रमशीला इ. दर्जेदार विद्यापीठांचा इतिहास आपल्या मागे असूनही, सध्यातरी एकही भारतीय विद्यापीठ आंतरराष्ट्रीय दर्जेदार विद्यापीठांमध्ये गणले जाऊ शकत नाही. इस्राईल, सिंगापूर सारख्या लहान देशांची विद्यापीठेही दर्जेदार यादीमध्ये येऊ शकतात, पण स्वातंत्र्यानंतर ७० वर्षांनंतरही आपल्या एकाही विद्यापीठाचा या यादीमध्ये समावेश होत नाही ही गोष्ट नक्कीच गंभीर आहे. याचीच दखल घेत पंतप्रधानांनी भारतातील १० सरकारी आणि १० खाजगी विद्यापीठांना १०,००० कोटीचे अनुदान देण्यात येईल असे जाहीर केले. या विद्यापीठांची निवड कुठल्याही सरकारी यंत्रणेतून न करता ती स्वतंत्र व्यवस्थेतून केली जाईल. त्याचप्रमाणे या संस्थांना आर्थिक, व्यवस्थापकीय स्वातंत्र्य तर देण्यात येईलच पण ती बाकीही सर्व सरकारी तपासण्यांमधून मुक्त असतील. यात एक गोष्ट मात्र स्पष्ट झाली नाही ती म्हणजे, या विद्यापीठांतून 'आरक्षण' असेल की नाही?

भारतीय विद्यार्थी हा बुद्धीमान आहे, कष्टाळू आहे. भारताबाहेर जेंव्हा तो जातो तेंव्हा तेथील विद्यापीठांमध्ये तो चांगली प्रगती करून दाखवतो. आपल्या I.I.T आणि I.I.M मधील विद्यार्थी परदेशात गेल्यावर तेथील विद्यापीठांमधून विशेष प्राविण्यांनी उत्तीर्ण होतात. एवढेच नाही तर जगातल्या अनेक मोठ्या कंपन्याही त्यांना उच्चपदावर नियुक्त करतात. गुगलचे सुंदर पिचाई काय, किंवा मायक्रोसॉफ्टचे सत्या नडेला काय, ही त्याची अलीकडची महत्त्वाची उदाहरणे आहेत. सिलीकॉन व्हॅलीमध्येही नवउद्योगांमध्ये (Startups) भारतीय विद्यार्थ्यांचे प्रमाण मोठे आहे. नोकरी निमित्त इंग्लंड अमेरिकेमध्ये स्थायिक झालेल्या भारतीयांची मुलेही स्थानिक मुलांपेक्षा उच्च शिक्षणामध्ये पुढे असतात. महत्त्वाचा प्रश्न हा आहे की, हिच भारतीय मंडळी भारतामध्ये ही प्रगती का करू शकत नाहीत? भारतामध्ये शिक्षण घेणारे हे विद्यार्थी, परदेशांत गेलेल्या आपल्या मित्रांच्या तुलनेनी संशोधनात भारतामध्येच प्रगती का करू शकत नाहीत?

गेल्या १०० वर्षांत भारतामध्ये विज्ञानामधले पहिले नोबेल पारितोषिक १९३० साली सी. व्ही. रमण यांना

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

मिळाले होते. त्यांचे संशोधन संपूर्णपणे भारतातच झाले होते. १९६८ साली हरगोविंद खुराणा, १९८३ साली सुब्रह्मण्यम चंद्रशेखर आणि २००९ साली व्यंकटरामन रामकृष्णन यांना विज्ञानामधील नोबेल पारितोषिकं मिळाली. हे सगळे भारतीय वंशाचे असले तरी, त्यांचे संशोधन की ज्यामुळे त्यांना नोबेल पारितोषिक मिळाले, ते सर्व अमेरिकेत झाले होते. गेल्या १०० वर्षांत ऑक्सफर्ड (Oxford) आणि कँब्रीज (Cambridge) विद्यापीठांनी १०० हून अधिक नोबेल पारितोषिक विजेते संशोधक निर्माण केले ही गोष्ट बोलकी आहे.

I.I.T किंवा I.I.M प्रमाणेच गेल्या १० वर्षात फक्त दर्जेदार संशोधनावर भर देणाऱ्या Indian Institutes of Science Education and Research (IISERs) या संस्थेची निर्मिती भारतातल्या वेगवेगळ्या राज्यांतून करण्यात आली. पहिल्या पाच वर्षांत त्यांच्या उभारणी करता ५ अब्ज रुपयांचा निधीही देण्यात आला. आज IITs ही ५ वरून वाढून २० वर गेल्या आहेत. पंतप्रधानांच्या घोषणेमुळे यामध्ये आणखीन २० विद्यापिठांची भर पडणार आहे.

१९४७ साली आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यापासून, डॉ. राधाकृष्णन, डॉ. कोठारींपासून राजीव गांधीपर्यंत, आणि नंतर येणाऱ्या प्रत्येक सरकारनी प्राथमिक शिक्षणापासून, विद्यापिठीय शिक्षणापर्यंत सुधारणा करण्याकरता अनेक मंडळांच्या केंद्रीय आणि राज्य स्तरावर नेमणूका केल्या. त्यांचे गठ्ठे मंत्रालयात आज धूळ खात पडले आहेत. डॉ. कोठारींनी आपल्या अहवालात काही मुलभूत सुधारणांची शिफारस केली होती. त्यातील 'दर्जा' किंवा 'संशोधना'च्या संदर्भात केलेल्या अनेक शिफारशींची अंमलबजावणी टाळण्यात आली.

बहुतेक सर्व राज्यांमध्ये शिक्षणमंत्र्यांची नेमणूक ही राजकीय सोय, आणि तडजोडीचा भाग म्हणूनच होत असते. येणारा प्रत्येक मंत्री आपला वेगळा ठसा उमटवण्याकरता मुलभूत शिक्षण प्रक्रियेशी संबंध नसणाऱ्या, अनेकवेळा व्यापक शिक्षणाला मारक अशी सवंग धोरणं अंमलात आणू लागला. त्याचा व्हायचा तोच परिणाम प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणावर झाला. भाषेपासून गणितापर्यंत सुमार दर्जाचे शिक्षण घेऊन महाविद्यालयीन शिक्षणात विद्यार्थी येऊ लागले. हेच विद्यार्थी पुढे व्यावसायिक शिक्षण आणि संशोधनामध्ये प्रवेश घेतात आणि विद्यापिठाची पदवी मिळाल्यावर व्यवसाय किंवा उद्योगधंद्यामध्ये नोकरी करू लागतात. 'दर्जा' आणि 'कौशल्य'हीन शिक्षितांची ही पीढी राजकारणापासून व्यवसायापर्यंत सगळ्या क्षेत्रात आज कार्यरत आहे. विज्ञानच नाही तर कला, साहित्य, स्थापत्य या सगळ्या क्षेत्रातच आज हा 'सुमार'पणा दिसून येतो. अर्थात याला अपवाद आहेतच. आपला देश जगात आज दुसऱ्या क्रमांकावर आहे आणि त्याला कमीतकमी ५००० वर्षांचा समृद्ध इतिहास आहे. आपल्या धर्माची हानी ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी केली नाही एवढी 'अस्मिता' आणि 'परंपरे'च्या नावाखाली स्वतंत्र भारतातील राजकारण्यांनी केली आहे. कल्पकता, नावीन्य आणि सर्जनशीलतेला शिक्षणातून हद्दपार केल्यावर दुसरे कुठले फळ पदरात पडणार?


भारतामधील संशोधनात हा सुमार दर्जा का? या प्रश्नाचे उत्तर देण्याकरता कुठल्याही आइनस्टाईनची गरज नाही. दर तासाला शिक्षणाचे सरकारीकरण स्वातंत्र्यापासून आज ७० वर्षे चालू आहे. शुल्कापासून प्रवेशापर्यंत, आणि शिक्षक

(पृष्ठ क्र. ३८ वर)

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा



वर्ष अठरावे/अंक १०/ऑक्टोबर २०१७

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २२ वे/अंक ४ था)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | भारतीय आणि जपानी संस्कृतीचा तुलनात्मक अभ्यास | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | स्वदेशवेध-०५ अक्षरधाम मंदिर, नवी दिल्ली | श्री. नरेंद्र गोळे | ७ |
| ४) | नर्मदा परिक्रमा (भाग : ७) | श्री. अरविंद ओक | ९ |
| ५) | आठवणीतले पी. सावळाराम | सौ. ज्योती केदारे | ११ |
| ६) | ओळख वनस्पतींची | श्री. प्रकाश दुधाळकर | १२ |
| ५) | अमेरिकेच्या व जगाच्या इतिहासातील एक महानायक : फ्रँक्लिन डिलानो रुझवेल्ट | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | १४ |
| ६) | महाराष्ट्रातील महान लेखक व पत्रकार अरुण साधु यांना भावपूर्ण श्रद्धांजली ! | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | ३० |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | ३१ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# भारतीय आणि जपानी संस्कृतीचा तुलनात्मक अभ्यास

*जपानमधील क्योटो सॅन्गो विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. कियोकुनी शिगा यांनी मागील महिन्यात डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन संस्थेत 'भारत आणि जपान या दोन संस्कृतींमधील साम्य आणि भेद' या विषयावर एक अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले होते. त्या व्याख्यानाचा स्वैर मराठी अनुवाद दिशा मासिकाच्या वाचकांसाठी सादर करण्यात येत आहे. - संपादक*

सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जपानच्या क्योटो सॅन्गो विद्यापीठातील पंधरा विद्यार्थी भारतात आले होते. भारतीय संस्कृतीचा अभ्यास करणे हा या भेटीचा मुख्य उद्देश होता. दोन आठवडे हे विद्यार्थी ठाणे शहरात होते. भारतीय परंपरा, संस्कृती आणि चालिरिती यांची त्यांना माहिती व्हावी यासाठी अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. त्याचा त्या विद्यार्थ्यांना बराच फायदा झाला असे त्यानी सांगितले. या विद्यार्थ्यांबरोबर त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी त्याच विद्यापीठातील एक प्राध्यापक आले होते. त्यांचे नाव डॉ. कियोकुनी शिगा असून भारतीय तत्त्वज्ञानाचा त्यांचा चांगला अभ्यास आहे. आपल्या कामाच्या निमित्ताने ते अनेकदा भारतात येऊन गेलेले आहे. त्यानी भारतीय संस्कृती जवळून पाहिली आहे. त्यांच्या या अनुभवाचा उपयोग करून घेण्याचे आम्ही ठरविले. 'जपानी आणि भारतीय संस्कृतीमधील साम्य आणि भेद' या विषयावर त्यांनी व्याख्यान द्यावे अशी आम्ही त्यांना विनंती केली. आमच्या विनंतीला मान देवून डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन संस्थेच्या पतंजली सभागृहात त्यांनी गुरुवार दिनांक १३ सप्टेंबर रोजी एक अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. त्या व्याख्यानाचा स्वैर मराठी अनुवाद या लेखात दिलेला आहे.

भारत आणि जपान या दोन संस्कृतींमध्ये सारखेपणा आहे, तसाच फरक देखील आहे. प्रथम आपण या दोन संस्कृतींत काय भेद आहेत ते पाहू. सगळ्यात महत्त्वाचा फरक जाणवतो तो संस्कृतीमधील विविधतेत. जपान हा देश आकाराने लहान आहे. त्यामुळे संपूर्ण देशातील चालिरिती जवळजवळ सारख्याच आहेत. भारतात मात्र तसे होत नाही. भारत हा आकाराने खूप मोठा देश आहे. त्यामुळे वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या चालिरिती आढळतात. जपानसारखी एकसूत्रता येथे आढळत नाही. असे जरी असले तरी 'विविधतेत एकता' हे भारताचे वैशिष्ट्य आहे. भारतात आमटी फारच प्रचलित आहे. भारतीय संस्कृतीला आमटीची उपमा देता येईल. आमटीमध्ये वेगवेगळे घटक जसे एकजीव झालेले असतात तसेच भारतीय संस्कृतीचे आहे. येथे वेगवेगळे समाज एकजीव झालेले आपल्याला दिसतात.

भारत आणि जपानच्या संस्कृतीत दुसरा फरक जाणवतो तो वक्तशीरपणात. जपानी लोक वेळेला खूप महत्त्व देतात. वेळेचे पालन करण्यात तर ते माहीर आहेत. तेथल्या गाड्या वेळेवर धावतात, त्यांचे सगळे कार्यक्रम वेळेवर सुरू होतात, कार्यालयात लोक वेळेवर पोहोचतात. याउलट भारताची स्थिती आहे. येथे उशीर करणे हे सर्वमान्य झाले आहे! येथल्या गाड्या दहा-दहा तास उशिराने धावतात असे मी ऐकले आहे. कार्यक्रमाचे काही संगायलाच नको. तो वेळेवर सुरू झाला तरच आश्चर्य करण्याची वेळ येते. लोकांनी कामावर वेळेवर यावे यासाठी भारतात अनेक युक्त्या-प्रयुक्त्या करण्यात

विश्वासघातकी लोकांमुळे ज्यांचा फायदा होतो ते देखील त्यांचा तिरस्कार करतात. - टॅसिटस

येतात. परंतु कार्यालयात उशिरा पोहोचण्याचे कुणालाही काही वाटत नाही. हा झाला माझा इतर ठिकाणचा अनुभव. विद्या प्रसारक मंडळाने मात्र मला या बाबतीत सुखद धक्का दिला आहे. येथे प्रत्येक कामात वेळ पाळली जाते असे मला आढळले आहे.

दोन संस्कृतींत आणखी एक फरक जाणवतो तो वहातुकीत. जपानचे लोक वहातुकीचे नियम काटेकोरपणे पाळतात. प्रत्येकजण आपापल्या लेनमध्ये राहतो, सिग्नल पाळतो, एका मगोमाग एक असे वाहन चालवितो. भारतात मात्र कोणीही नियम पाळत नाहीत. सिग्नल लाल असताना देखील आपण थांबावे असे त्यांना वाटत नाही. पुढे असलेल्या वाहनावर कुरघोडी करून आपण पुढे जाण्यात येथल्या वाहनचालकांना मोठा आनंद होतो. सगळ्यात वाईट गोष्ट म्हणजे हॉर्न (भोंगा) वाजविण्याची सवय. जपानमध्ये रस्त्यांवर शांतता असते. क्वचितच कुणीतरी हॉर्न वाजवितो. येथे मात्र प्रत्येकच वाहनचालक सतत हॉर्न वाजवत असतो. रस्त्यावर विशेषतः चौकात सावळागोंधळ असतो, सर्व बाजूंनी वाहानांचे कर्णकर्कश आवाज सतत कानावर पडत असतात. भारतीय लोकांना हॉर्नचे एव्हढे आकर्षण का असावे याचा मी विचार करू लागलो तेव्हा माझ्या असे लक्षात आले की, हॉर्न वाजविणे ही भारतीय लोकांची संदेश देण्याची पद्धत आहे. तुम्ही पाहिले असेल की प्रत्येकाची हॉर्न वाजविण्याची पद्धत वेगवेगळी असते. कोणी हॉर्न वाजवून हे सांगत असतो की मी गाडीचा मालक आहे, तुमच्यासारखा पादचारी नाही. कोणी हॉर्नच्या माध्यमातून हे दाखवू इच्छितो की माझी गाडी तुझ्यापेक्षा मोठी आहे. तर कोणी हे सांगण्यासाठी हॉर्न वाजवतो की हा माझा रस्ता आहे; कोणी माझ्यापुढे येण्याचे धाडस करू नका.

भारतामध्ये पाठांतराची एक मोठी परंपरा आहे. वेद, उपनिषदं तसेच भगवदगीता इथल्या लोकांनी शेकडो वर्षे केवळ पाठांतराच्या भरोशावर टिकवून ठेवली आहेत. पाठांतराची ही पद्धत आजही भारतीय शालेय शिक्षणात वापरली जाते. त्यामुळे भारतीय माणसाला केवळ पाढेच नाहीत तर इतर अनेक गोष्टी पाठ असतात. प्रत्येक वेळेला त्यांना माहितीसाठी पुस्तक पाहायला लागत नाही. भारतातील बरेच लोक एकपाठी असतात असे मी पाहिले आहे. एखाद्या बैठकीला ते आले तर बैठकीत झालेले निर्णय त्यांना लिहून घ्यावे लागत नाहीत. ते त्यांच्या डोक्यात असतात. स्मरणशक्तीच्या जोरावर हवे तेव्हा ते आठवू शकतात. एका लेखकाने असे म्हटले आहे की; 'डोक्यात असलेले ज्ञान म्हणजे आपल्या स्वतःच्या पाकिटात असलेल्या पैशासारखे आहे. ते आपण कधीही वापरू शकतो. वहीत नोंदविलेले किंवा पुस्तकात लिहिलेले ज्ञान हे दुसऱ्याच्या पाकिटात असलेल्या पैशासारखे आहे. त्यांचा आपल्याला हवा तेव्हा उपयोग होईलच याची खात्री देता येत नाही.' पाठांतराच्या सवयीचा भारतीय माणसांना आंतरराष्ट्रीय स्तरावर खूप उपयोग झाला आहे. म्हणूनच तर मोठमोठ्या कंपन्यांचे प्रमुखपद भारतीयांकडे आले आहे.

सहिष्णूता हे भारतीयांचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. येथे वेगवेगळ्या वर्णाच्या व्यक्तिंना स्वीकारले जाते. वाटेल तसा गणवेश ती व्यक्ती परिधान करू शकते. मोटारी चालणाऱ्या रस्त्यावर गायी, कुत्री आलेली येथे चालतात. त्यातून वाट काढत इथली मंडळी गाड्या चालवतात. जपानमध्ये मात्र ही सहिष्णूता क्वचितच पाहायला मिळते. तिथे वागण्यात, बोलण्यात किंवा गणवेशात फारशी विविधता आढळत नाही. आपण बहुसंख्यांसारखेच दिसले आणि वागले पाहिजे असा सगळ्या जपानी लोकांचा आग्रह असतो. त्यामुळे विविधता स्वीकारण्याऐवजी विविधतेला मूठमाती देण्याचा प्रकार जपानमधे आढळतो. या बाबतीत जपानी लोकांना भारतीयांकडून बरेच काही शिकण्यासारखे आहे हे मी नमूद करू इच्छितो.

---

जरुरीच्या वेळी न बोलता जो मित्र गप्प राहतो, तो मित्र विश्वासघातकी समजावा. – हॅजालिट

जपान आणि भारत या दोन देशांच्या संस्कृतीत असलेले काही भेद आपण पाहिले. आता आपण या दोन संस्कृतींमध्ये साम्य काय आहेत ते पाहू या. तुम्ही जर एखाद्या जपानी माणसाला विचारले 'तू धर्माचे पालन करतोस काय?' तर बरेच लोक 'आम्ही धर्मच मानत नाही' असेच सांगतील. आपण निधर्मी आहोत असे म्हणण्याची सध्या जपानमध्ये फॅशन आली आहे. प्रत्यक्षात मात्र त्यांचे वागणे धार्मिक शिकवणुकीच्या चाकोरीतच बद्ध झालेले असते असेच तुम्हाला आढळेल. अनेक प्रकारचे धार्मिक सण ते साजरे करतात. अशीच काहीशी स्थिती भारतात आहे. भारतातील बहुसंख्य लोक कोणत्या ना कोणत्या धर्माला बांधलेले आहेत. धार्मिक विधी, कर्मकांड यांचे या देशात प्राबल्य आहे. एव्हढे की ते कमी व्हावे यासाठी येथे काही सामाजिक संस्था काम करीत आहेत.




**गिऑन मात्सुरी समारंभ (क्योटो)**



**कंदा मात्सुरी समारंभ (टोक्यो)**

जपानी लोक एखाद्या धर्माचे पालन करोत अगर न करोत ते श्रद्धास्थानाला मात्र खूप महत्त्व देतात. जपानमध्ये अशी श्रद्धास्थाने अनेक आहेत. अशी काही उदाहरणे देता येतील. भारतीय लोक देखील अशा ठिकाणांना अपार महत्त्व देतात. देशात अनेक श्रद्धास्थाने आहेत. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत देशाच्या सर्व भागात अनेक मंदिरे आहेत. ती भारतीय लोकांची श्रद्धास्थाने म्हणून प्रसिद्ध आहेत. तेथे भरणाऱ्या यात्रांना लोक गर्दी करतात.



**किनकाकुजी मंदिर (क्योटो)**



**तोडाइजी मंदीर (नारा)**

जपानी लोकांवर बुद्ध धर्माचा प्रभाव आहे. साधारणपणे सहाव्या शतकात चीन आणि कोरियामधून हा धर्म जपानमध्ये आला. त्याचा सर्वत्र प्रसार झाला. कुठे भारतप्रणीत बुद्ध धर्म, कुठे कोरियाप्रणीत बुद्ध धर्म तर कुठे चीनप्रणीत बुद्ध धर्माने आपले बस्तान बसविले.

---

प्रवासाने सहिष्णुतेचा गुण अंगी येतो. - बी. डिस्राएली

त्यामुळे भारताप्रमाणे बहुदेवत्वाची संकल्पना देशात सर्वत्र पसरली. म्हणूनच देशाच्या विविध भागांत वेगवेगळी देवळे आपल्याला पाहायला मिळतात. एकट्या क्योटो शहराचा जरी विचार केला तरी तेथे १६०० मंदिरे आढळतात. भारतातील मंदिरांबद्दल काहीही बोलायची गरज नाही. येथे प्रत्येक समाज आपला देव निवडू शकतो. त्याची प्रतिमा स्थापन करून त्याची पुजा-अर्चा करू शकतात. त्यामुळे अनेक देवांची अनेक प्रकारची मंदिरे भारतात आढळतात.

आपल्या पूर्वजांची आठवण ठेवणे हे आणखी एक साम्य दोन संस्कृतींमध्ये आढळते. जपानमध्ये १२ ते १६ ऑगस्ट हे पाच दिवस हा मरण पावलेल्या पूर्वजांची आठवण करण्यासाठी राखून ठेवले आहेत. १२ ऑगस्ट रोजी लोक घरापुढे विस्तव करतात. त्याला 'स्वागत विस्तव' म्हणतात. असाच विस्तव ते १६ ऑगस्टला करतात. त्याला 'निरोप विस्तव' म्हणतात. १२ तारखेला घोड्याची प्रतिमा करून ठेवतात. घोडा हा जलद चालण्यासाठी प्रसिद्ध आहे. ही प्रतिमा विस्तवापाशी ठेवून यजमान मृत आत्म्याला असे सांगू इच्छितात की, 'तू घोड्याच्या वेगाने ये.' निरोपाच्या दिवशी मात्र गायीची प्रतिमा करून ठेवतात. गाय सावकाश चालते. 'गायीप्रमाणेच तू देखील सावकाश परत जा' असेच यातून सुचवायचे असते. भारतामध्येदेखील मृत आत्म्याची आठवण ठेवण्याची पद्धत आहे. येथल्या



पूर्वजांना दिलेला शिधा

प्रथेनुसार मृत नातेवाइकाचा आत्मा कावळ्याच्या रूपाने येतो. म्हणून त्या व्यक्तिला आवडणारे खाद्य पदार्थ बनवून ते कावळ्याला देण्याची पद्धत भारतात आहे. तशीच शिधा देण्याची पद्धत जपानमध्ये देखील आहे.

भारतामध्ये कोणतेही काम सुरू करण्याआधी गणेशाचे स्मरण करण्याची प्रथा आहे. वर्षभर या देवाची आराधना केली जाते. देशात जागोजागी गणेशाची देवळे बांधली आहेत. याखेरीज भाद्रपद मासात गणेशचतुर्थीला गणेशाच्या मूर्ती बसवून त्यांची पूजा केली जाते. जपानमध्ये देखील गणेशाची पूजा केली जाते. भारताच्यामानाने तेथे गणेशाचे प्रस्थ जरा कमी आहे. तरीही जपानमध्ये गणेशाची मंदिरे आढळतात.



गणेश मंदिर (टोक्यो)

जपान आणि भारत या दोन वेगवेगळ्या देशांतील संस्कृतीमधील सारखेपणा आणि फरक आपण पाहिला. या दोन संस्कृतींमध्ये जरी थोडा फरक असला तरी अनेक बाबतीत सारखेपणा आहे हेच आपल्या लक्षात येते. त्यामुळे या दोन देशांत देवाणघेवाणीला खूप वाव आहे. त्यादृष्टीने प्रयत्न करण्याची गरज आहे.

**- डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण-शीळ रोड,
काटई, ता. कल्याण,
जि. ठाणे - ४२१२०४

प्रवासाने माणूस खूप शहाणा होतो, पण सुखी होत नाही. - टी. जेफरसन

# स्वदेशवेध-०५ अक्षरधाम मंदिर, नवी दिल्ली

*नवी दिल्ली येथील अक्षरधाम मंदिरचे वर्णन या लेखात केले आहे. - संपादक*

१७८१ साली अयोध्येत एका घनश्याम नावाच्या मुलाचा जन्म झाला. तो बुद्धिमत्तेने कुशाग्र आणि आरोग्यवान होता. वयाच्या चवथ्या वर्षी त्याने वेदाध्ययनास सुरुवात केली. वयाच्या अकराव्या वर्षी त्याचे वेदाध्ययन पूर्ण झाले. परिचित परिसराचे ज्ञान पूर्ण होताच त्याला अपरिचित परिसराचे, अज्ञाताचे वेध लागले. अकराव्या वर्षीच तो घर सोडून अज्ञाताच्या शोधात बाहेर पडला. फिरत फिरत हिमालयात गेला. तिथे त्याने तपश्चर्या केली. तिथे तो नीळकंठ म्हणून ओळखला जाऊ लागला. मग भारत दर्शनार्थ पूर्वोत्तर राज्यांत फिरला. गुवाहाटीस कामाख्या मंदिर पाहिले. पूर्व किनाऱ्यावर भुवनेश्वरला गेला. सूर्यमंदिर पाहिले. मग रामेश्वरमला गेला. दक्षिणेतील राज्यांचा प्रवास करत मग तो त्र्यंबकेश्वरला आला. तिथून पुढे चालत चालत, वयाच्या अठराव्या वर्षी, गुजरातेतील लोज या गावी पोहोचला. वयाच्या अकराव्या वर्षापासून अठराव्या वर्षापर्यंत सात वर्षांच्या कालावधीत १२,००० किलोमीटरचा प्रवास पायी करून त्याने भारतदर्शन केले.



**अक्षरधाम मंदिर, नवी दिल्ली**

लोज इथे स्वामी रामानंद यांचा आश्रम होता. त्यांना कल्पना होती की असा एक दिव्य पुरुष इथे येणार आहे. तो तिथे पोहोचताच त्यांनी त्याचे स्वागत केले. आपल्या अनुयायांना तोच आपला उत्तराधिकारी असल्याचे सांगितले. तेव्हा तो स्वामिनारायण म्हणून ओळखला जाऊ लागला. स्वामिनारायण वयाच्या एकोणपन्नासाव्या वर्षी, १८३० साली निवर्तले. त्यांच्या उण्यापुऱ्या एकोणपन्नास वर्षांच्या आयुष्यात त्यांनी असंख्य अनुयायी मिळवले. मृत्यूची भीती सोडल्यास जीवनातील आनंदाचा उत्तम आस्वाद घेता येतो आणि चराचर सृष्टीतील प्रत्येक सजीव आपल्या प्रेमास पात्र आहे. प्रेम करण्यात आनंद आहे. अशी शिकवण त्यांनी दिली. त्यांच्या मृत्यूपश्चात आज सुमारे दोनशे वर्षे लोटून गेलेली आहेत. तरीही त्यांच्या अनुयायांची संख्या वाढतीच आहे. त्यांच्या अनुयायांनी जगभर निर्माण केलेल्या अक्षरधाम मंदिरांची मालिकाही सदा समृद्ध होत आहे. अशातच नवी दिल्ली इथे नुकतेच बांधले गेलेले अक्षरधाम मंदिर भारताच्या समृद्ध परंपरेचे अत्याधुनिक प्रदर्शनच ठरावे एवढे भव्य, देदिप्यमान आणि संस्मरणीय आधुनिक तीर्थक्षेत्र आहे.

या मंदिरास भेट देण्याचा योग मला नुकताच लाभला. त्या मंदिरास भेट देऊन जो दिव्यतेचा स्पर्श माझ्या मनाला झाला, त्याची माहिती ज्यांनी ते मंदिर अजूनही पाहिलेले नाही त्यांचेकरता करून द्यावी असे

मला प्रकर्षाने वाटले. म्हणूनच मी हा लेख लिहिण्यास प्रवृत्त झालेलो आहे.

प्रमुख स्वामी महाराज यांच्या प्रेरणेतून साकारलेले हे मंदिर, नवी दिल्ली शहराबाहेर, पूर्वेला, गाझियाबादच्या वाटेवर (राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २४), यमुनेवरील निझामुद्दीन पूल पार करताच दिसू लागते. १०० एकर जागेवर निर्माण केलेले हे मंदिर, निव्वळ नैसर्गिक दगडांना एकावर एक ठेवून तयार केलेले आहे. निर्मितीत लोखंडाचा वापर केलेला नाही. मुख्य मंदिरात ११ फूट उंचीची, भगवान स्वामिनारायण यांची पद्मासनस्थ भव्य मूर्ती प्रतिष्ठित आहे. ती पंचधातूंची घडवलेली असून सुवर्णमंडीत आहे. मंदिरास आपल्या भारतीय परंपरेनुरूप हत्तीशिल्पांचे तोरण असलेला उंच पाया आहे. त्यातील १४८ हत्तींपैकी एकही हत्ती दुसऱ्यासारखा नाही. वालुकाश्रमातून एक-एक हत्ती दहा-दहा फूट उंच आणि प्रमाणबद्ध घडवलेला आहे. प्रथमच पाहणारा भाविक केवळ भव्यतेनेच भारून जातो. २३४ स्तंभांवर तोललेले, १४१ फूट उंच मंदिर, १३६ फूट रुंद असून ३५६ फूट लांब आहे. ते गुलाबी पत्थर व शुभ्र संगमरवरातून घडवलेले आहे.

मंदिर परिसराचे वैशिष्ट्य म्हणजे सर्वदूर असलेली कमालीची स्वच्छता, शांतता, शिस्त आणि सुव्यवस्था. परिसरातील प्रत्येक प्रेक्षणीय स्थळाच्या प्रवेशापाशीच असलेली पुरेशी प्रसाधन व्यवस्था आणि जागोजागी असलेली पिण्याच्या पाण्याची व्यवस्था. कित्येकदा तर मला इथे माणसांपेक्षा कचराकुंड्याच जास्त आहेत की काय असा संशय येई, इतक्या कचरा कुंड्या इथे आहेत. एकही ओसंडून बाहेर वाहताना दिसली नाही. सुरक्षेच्या कारणास्तव मंदिरात पर्स-पाकिटे, पिशव्या, मोबाईल इत्यादी वस्तू जवळ बाळगण्यास मनाई आहे. मात्र प्रवेशापाशीच त्या वस्तू बाहेर मंदिर व्यवस्थापनाकडे जमा करून, परतताना परत घेण्याची छान व्यवस्था विनामूल्य केलेली आहे. परिसरात उपाहारगृहे यथास्थित उपलब्ध करून दिलेली आहेत आणि त्यात वाजवी दरात गरजेचे पदार्थ मिळण्याची सुंदर व्यवस्था आहे. दररोज लाखो लोक संकुलास भेट देत असूनही कुठे गर्दी, गोंधळ, गैर-व्यवस्था होत असल्याचे दिसत नाही. कॅमेरे व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणेही बाहेरच सोडावी लागतात. मात्र उपलब्ध सी.डी.ज व पुस्तकांतून परिसराचे उत्तम छायाचित्रण वाजवी दरात सहज उपलब्ध करून दिलेले आहे. संकुलाबाहेरच वाजवी दरातील वाहनतळाची पुरेशी व्यवस्था आहे. मंदिराची विस्तृत माहिती http://www.akshardham.com/ किंवा http://www.swaminarayan.org/ या संस्थळांवर सहज उपलब्ध आहे.

संकुलात स्वामिनारायण मंदिराव्यतिरिक्त एक भव्य संगमरवरी राममंदिर, तीन प्रदर्शने आणि एक रंगप्रकाशित, संगीतावर थिरकणारे कारंजे आहे. मंदिर पाहण्यास ३० मिनिटे, राममंदिरास ३० मिनिटे, पहिल्या सहजानंद प्रदर्शनास ५० मिनिटे, दुसऱ्या भव्य पडद्यावरील नीळकंठदर्शन चित्रपटास ४० मिनिटे, तिसऱ्या संस्कृतीविहार नौकानयनास १५ मिनिटे आणि खानपानास ६० मिनिटे, याव्यतिरिक्त मोठाली अंतरे चालणे व प्रतीक्षाकाल गृहीत धरता किमान साडेचार तास (४ तास ३० मिनिटे) इतका वेळ मंदिर संकुलाच्या अर्थपूर्ण दर्शनास आवश्यक आहे. खरे तर अनेक दिवस दिल्लीत राहून सावकाश हे मंदिर पाहण्याची इच्छा ह्या पाहण्यानंतर उत्पन्न होते. तीन प्रदर्शने व कारंजे यांखेरीज इतर सर्व संकुलांत प्रवेश विनामूल्य आहे.

तिन्ही प्रदर्शनांत प्रवेश शुल्क आकारण्यात येते. सर्व मिळून रु. १२५/- दर व्यक्तीस पडतात. प्रदर्शने क्रमानेच उघडत जात असल्याने क्रमानेच पाहता येतात. पहिले प्रदर्शन साधारणतः सकाळी अकरा वाजता उघडते. त्यात अनेक दालनांतून पाच-पाच मिनिटांचे ध्वनी-प्रकाशांकित, संजीवित प्रसंग स्वामिनारायणांच्या जीवनातील प्रसंग पुन्हा साकार करतात. त्यातील देखावे सत्य वाटावेत इतके हुबेहूब साकारलेले आहेत. त्या त्या व्यक्तींचे पुतळे हालचाल करतात, बोलतात आणि

(पृष्ठ क्र. २९ वर)

प्रवासावरून केव्हा परतावे हे ज्याला कळते तोच उत्तम प्रवासी! - मिडलटन

# नर्मदा परिक्रमा

**भाग : ७**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत – संपादक*

**दिवस ११ वा सोमवार २/१२/२०१३**

काल रात्री साबणात घालून कपडे धुतले होते. सकाळी ५।। वाजता उठून हातपंपावर स्नान केले. नरसिंगपूर रस्त्याने पाऊण कि.मी. चाललो आणि आठवले की काठी विसरलो आहे.

वाटेत फॉरेस्ट अधिकाऱ्याशी गप्पा मारत त्याला त्याच्या चेकपोस्टवर सोडून पुढे निघालो आणि काठीची आठवण झाली.

चेकपोस्टवर सामान ठेवून काठी घेऊन आलो व तिथेच बस धरली. नदीच्या अलीकडे बस सोडली (१५ रु.) वर एका सहप्रवाशाबरोबर ओळखझाल्याने ५ कि.मी. वरील त्याच्या कामाच्या जागी ऑटोने गेलो. तिथे त्याने मला चहा दिला व निघून गेला.

अर्धा पाऊण कि.मी. मी पुढे (चपला बदलून बूट घातले) चालत गेलो आणि गोटेगाव येथे जाणारी बस मिळाली (४० रु.) मी बाबाजी म्हणून २० रु. कमी एरव्ही ६० रु.

दोन्ही वेळा सॅक डिक्कीत ठेवली व गोटेगाव येथे उतरलो तेव्हा सॅकचा धूळ हनुमान झाला होता.

गोटेगाव मोठे आहे. पण आज बाजारपेठ बंद होती. रेल्वे स्टेशन जवळ आहे हे कळल्याने तिकडे चाललो होतो. मुळा घेऊन खाण्यासाठी थांबलो त्या भाजीवाल्याचे 'प्रल्हाद पटेल' यांच्याकडे परिक्रमावासींची व्यवस्था होते हे सांगितल्याने प्रथम मागे वळून तिथे गेलो. रामसिंग या वॉचमनने ओळखपत्र मागितले व माझी भोजन व्यवस्था करून तो निघून गेला. हे पटेल विधायक आहेत हे कळल्यावर मला कळले की ग्वारी घाटा अलीकडे ज्या प्रल्हाद पटेलांच्या अन्नक्षेत्रात मी जेवलो होतो ते पटेल हेच होत.

इथे जेवावे, कपडे वाळवावे व नंतर १५ कि.मी. वरील जोतेश्वराला भेटून यावे हा विचार होता. पाहिजे तर एक रात्र काढावी असे वाटत होते.

भोजन तयारच होते. घराच्या ओट्यावर जेवायला बसविले. पुऱ्या, पालेभाजी व दूध/दही भात व दोन बेसनवड्या!

थांबायचे या हिशेबाने मी बूट पॅक केले होते. भोजन झाल्यावर मी कपडे वाळत घालण्याची अनुमती मागितली तर आजींचा सूर लगेच रागीट लागला.

'ताबोडतोब बाहेर व्हा आणि बाजूच्या शाळेत जाऊन थांबा, फक्त भोजनाची सोय केली होती' असे परखडपणे बोलून मला जवळपास हाकलूनच लावले.

तरी मी देवाला (अंगणात प्रवेशद्वारापाशी आतच मंदिर आहे) नमस्कार केला. आत गेलेल्या माईंना बाहेर बोलावले. अति त्रासिक मुद्रेने त्या पडवीत आल्या.

एक श्लोक म्हणायचा आहे असे सांगून मी 'सर्वेत्र सुखिनः सुन्तु सर्वे सन्तु निरामयाः' हा श्लोक शांतपणे म्हटला व 'आपला परिवार सदा सुखी निरामय स्वास्थ्याचा आणि भरभराटीची राहो व मैय्याची अशीच सेवा आपल्याकडून होत राहो' असा हिन्दी अर्थ सांगून निरोप घेतला.

शहाणा प्रवासी स्वदेशाचा कधी तिरस्कार करत नाही. – इमरसन

माईंना वॉचमनने फक्त भोजनाचे सांगितले असावे. परंतु भोजनानंतर मी थांबू पाहतोय या आविर्भावाने त्या इतक्या विलक्षण आक्रमक झाल्या की मी अंतर्यामी पार कोलमडलो. माझ्या अहंकारावर फार मोठा वार झाला आणि मी अतिशय अपमानित अवस्थेत स्टेशनचा रस्ता धरला.

दीड वाजता मी गोटेगाव या मेन एक्सप्रेस गाड्या थांबतात त्या रेल्वे स्टेशनवर आलो.

होशंगाबाद तिकीट मागितले तर ४।।। वाजता गाडी आहे, तिकिट ४ वाजता काढा (१००रु.) असा सल्ला मिळाला.

स्टेशनवर येऊन ओले कपडे वाळत घातले आणि पोर्टरकडे सहज चौकशी केली तर आता २ ची हावडा मुंबई येतेय, त्याने इटारसीला उतरून होशिंगाबादला जा असा सल्ला मिळाला.

१.५० झाले होते. गाडीची घोषणा झाली होती. पुलावरून आलेला मी रेलिंगमधून घुसून तिकीट काढायला गेलो तर तिकीट देईना. होशंगाबाद नाही तर इटारसी द्या असे सांगण्याऐवजी मी कटनी तिकीट मागत होतो. वाळत घातलेले कपडे पटकन आवरून ही धावपळ मी केली होती. दरम्यान गाडी आली.

'तिकीट नाही तर असेच चढा, बाबाजी लोक असेच करतात' असे तो पोर्टर सांगत होता. अर्थात मी ते ऐकले नाही. मैय्याची इच्छा म्हणून थांबलो. कपडे पुन्हा वाळत घातले आणि डायरी लिहिण्यासाठी बसलो.

गोटेगावला येताना एका स्टॉपजवळ (चरगँवा) चालू बस थांबवून बाहेरच्या एकाने निदर्शनास आणले की चाकाचे दोन नट निघून गेले आहेत व उरलेले सुद्धा सैल असल्याने फिरतायत. नट घट्ट करून गाडी निघाली व मैय्याने संभाव्य अपघातापासून वाचविले असे वाटले.

आताही २ ची गाडी चुकण्यात असाच काही दैवी संकेत असेल तर? नाहीतरी आलेली हावडा मुंबई गाडी गच्च भरली होती. गोटेगाव जवळ असले तरी रेल्वे स्टेशनचे नाव 'श्रीधाम' असे आहे.

जबलपूर-हबीबगंज (भोपाळजवळ) इण्ट्रासिटी सुपर फास्ट गाडीचे तिकीट १००रु? पण वरिष्ठ नागरिक म्हणून मला ५५ रु. अंतर २०९? कि.मी. (होशंगाबादला किराया सूची पाहिली तर भाडे ५५ रु.च दाखविले होते. परंतु १००रु.तिकीट आहे असे मला दुपारच्या बुकिंग क्लार्कने सांगितले होते).

४.४६ सायं. गाडी आली. सामानासह सुखरूप चढलेला मी जागा शोधत शोधत निघालो. टीसी दिसला त्याला सांगितले की मला होशंगाबादपर्यंत एक सीट हवी आहे. 'सगळी गाडी आपलीच आहे. डी-५ मध्ये सीट रिकाम्या आहेत' असे त्याने सांगितले.

प्रत्यक्षात मी मागच्या डब्यात चढून पुढे पुढे येत असता प्रत्येक बाजूला असलेल्या ३-३ सीट पैकी दोन दोन सीटच भरलेल्या दिसल्या. परंतु कॅरिअरवर मात्र सामानासाठी तसूभरही जागा नव्हती. तिसरी सीट कुणी बसले आहे असे बहुधा खोटे सांगत होते.

डी-५ खरोखर कॅरिअर रिकामा आणि दोन-दोन जणच असले तरी मला विचारल्याबरोबर एकाने उठून जागा दिली व तो दुसरीकडे गेला.

ही गाडी आपल्या लोकलसारखी. त्यामुळे माणसे चढत, उतरत होती. परंतु हळूहळू डबे रिकामे होत गेले. ८ ते ८।। गाडी इटारसी जंक्शनला थांबली आणि ८.५५ ला गाडीने होशंगाबाद गाठले. इटारसीपर्यंत पुढे जाणारी गाडी त्यानंतर मागच्या दिशेने चालली ते का, हे मला उमगले नाही. अर्थात इटारसीपासून तिचा मार्ग बदलतो.

(पृष्ठ क्र.१३ वर)

# आठवणीतले पी. सावळाराम

*कवी, गीतकार म्हणून प्रसिद्ध असलेल्या पी. सावळाराम यांचा अल्पपरिचय या लेखात दिला आहे - संपादक*

मानसीचा चित्रकार तो ... आपल्या गाण्यांतून महाराष्ट्राच्या घराघरांत सोज्वळ, उदात्त भावनांची पेरणी करणाऱ्या जनकवी पी. सावळाराम यांचे जन्मशताब्दी वर्ष ह्या जुलैला २०१७ समाप्त झाले.

पी. सावळाराम यांचा जन्म ४ जुलैला झाला. त्यांचे मूळ नाव होतं निवृत्तीनाथ आबासाहेब पाटील. सावळाराम हे काक रावजी ह्यांना दत्तक गेल्याने ते निवृत्तीनाथ आबासाहेबचे निवृत्तीनाथ रावजी झाले. आणि पुढे हेही नाव बदलून सर्व परिचित असे पी. सावळाराम बनले. हा नाम महिमा मजेशीर आहे. त्यांच्या सुरुवातीच्या कविता निवृत्तीनाथ पाटील ह्याच नावानं प्रसिद्ध झाल्या. निवृत्तीनाथाचे ते सावळाराम कसे झाले याची मोठी कथा आहे. विधानसभेचे माजी अध्यक्ष आणि रोजगार हमी योजनेचे जनक वि. स. पागे हे सावळारामांचे शाळेतले मित्र. आधुनिक कादंबरीचे जनक प्रसिद्ध साहित्यिक ह. ना. आपटे यांच्या उषःकाल कादंबरीतील सावळ्या ह्या व्यक्तिरेखेशी निवृत्तीनाथ ह्याचं साधर्म्य आहे असे पागे ह्यांना वाटे व त्यावरून ते त्यांना 'सावळ्या' अशी हाक मारत. त्याच काळात नागपूर आकाशवाणी केंद्रावर निवृत्तीनाथ पाटील नावाचे एक बासरी वादक होते. या सारख्याच नावामुळे घोटाळा होऊ नये यासाठी कवी गीतकार म्हणून प्रसिद्धीला येणाऱ्या निवृत्तीनाथ पाटील यांनी आपलं नाव बदलून पी. सावळाराम असं ठेवलं. पुढे हेच नाव रुपेरी पडदा, आकाशवाणी, ध्वनिमुद्रिका ह्या तिन्ही प्रसारमाध्यमांमध्ये गीतकार म्हणून नावारुपाला आलं.

कवीवृत्तीच्या या सावळारामांवर प्रा. माधव पटवर्धन यांचे साहित्यसंस्कार झाले. कारण कोल्हापूर येथील राजाराम महाविद्यालयात प्रा. माधवराव पटवर्धन त्यांना शिकवायला होते. महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून बी.ए.बी.टी व्हायचं हे त्यांच्या आयुष्याचं ध्येय होतं. या ध्येयरस्त्याचा त्यांचा आदर्श आचार्य अत्रे होते. परंतु १९४२ मध्ये 'चले जाव' चळवळीच्या धामधुमीत त्यांचं बी.टी. होणं मागे पडलं. १९४३ साली विवाहीत झाल्यावर सावळारामांनी ठाण्याला संसार थाटला. १९४५ साली रेशनिंग इन्स्पेक्टरची नोकरी करतानाच पुन्हा गीतलेखन सुरू झालं. त्यांचं पहिलं गीत १९४८ साली प्रकाशित झालं. 'राघू बोले मैनेच्या कानात गं' या पहिल्या गीताने त्यांची काव्यगंगा जोमाने प्रवाहीत झाली.

पी. सावळाराम यांची काव्यलेखनाची भाषा साधी व सोपी आहे. त्यामुळेच मराठी माणसांच्या जीवनातील घडामोडींना सर्वांगीण सागर, देव, आई, लहान बाळ, वृक्ष, पाऊस, संसार इत्यादी सर्व परिचित शब्द त्यांनी आपल्या काव्यात वापरून सोप्या तालबद्ध भाषेत काव्यरचना केली. त्यांची ७२ भावगीतं अतिशय लोकप्रिय झाली.


१९६३ साली त्यांनी महाराष्ट्र राज्य तमाशा मंडळाचे अध्यक्षपदही भूषविले. मोलकरीण चित्रपटातील 'देव जरी मज कधी भेटला' या गाण्याबद्दल त्यांना फाळके पुरस्कार मिळाला. तसेच काव्यक्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्यांना ग. दि. माडगुळकर यांच्या

(पृष्ठ क्र. ३७ वर)

# ओळख वनस्पतींची
# कोको चॉकलेटचे झाड

*'ओळख वनस्पतींची' या लेखमालेतील एकविसावा भाग. 'कोको चॉकलेटचे झाड' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे - संपादक*

मित्रांनो, चॉकलेट न आवडणारी किंवा न खाणारी व्यक्ती आजच्या युगात तरी शोधूनही सापडणार नाही. आजच्या धकाधकीच्या जीवनात जिथे जेवायलाही वेळ मिळत नाही अशावेळी चालता चालताच एखादे चॉकलेट खाऊन पुनः स्वतःला कामाच्या व्यापात गुंतवून घेणारे किंवा नुसत्या चॉकलेटवरच भुकेची वेळ मारून नेणारे अनेकजण मी पाहिले आहेत. हे सर्व अयोग्य असूनही परिस्थितीशी हातमिळवणी केल्याशिवाय पुढची प्रगती शक्य नसते हे ही मला माहीत आहे. पण अशी वेळ मारून नेण्याचे व जेवणाला बुट्टी देण्याचे प्रकार वारंवार होत असतील तर ते थांबविलेच पाहिजे.



चॉकलेटचे महत्त्व तरीही अबाधित राहते. कारण चॉकलेटने आपल्या जीवनात निर्माण केलेले अढळ स्थान. एक मिठाई म्हणून आपल्या रोजच्या व्यवहारातील एक जागा चॉकलेटने केव्हाच बळकावली आहे. असे हे चॉकलेट ज्यापासून तयार करतात ती कोको पावडर कोको नावाच्या फळांच्या बियांपासून तयार करतात.

कोकोचे मूळ आहे मध्य अमेरिकेतील ब्राझील व पेरू या देशांमध्ये. तेथे नैसर्गिकरित्या ही झाडे विपूल प्रमाणात वाढतात. तेथील आदिवासी फार पूर्वीपासून या फळांचे विविध खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी तसेच मादक पेय तयार करण्यासाठी याचा वापर करायचे. कोलंबसाने जेव्हा अमेरिकेचा शोध लावला त्यावेळी त्याला या फळाची माहिती मिळाली. त्याने ते स्पेनमध्ये नेले व १५०० व्या शतकात सर्व युरोपमध्ये या फळाच्या महतीबद्दल माहिती झाली. सद्यस्थितीत आयसी कोस्ट या पश्चिम आफ्रिकेतील राज्यांमधून वर्षाला १३.३० लाख मेट्रीक टन एवढ्या कोको बीयांची निर्यात होते. दुसरा क्रमांक आहे तो घाना या देशाचा. वर्षाला आठ लाख मेट्रीक टन निर्यात. भारत यामध्ये १७ व्या क्रमांकावर आहे. वर्षाला सरासरी १० हजार मेट्रीक टन एवढीच निर्यात आपण करतो. याला कारण आहे. भारतात कोकोचे उत्पादन फक्त केरळ, तमीळनाडू कर्नाटक व आंध्रप्रदेश येथील किनारपट्टीच्या भागातच होते.

कोकोचे शास्त्रीय नाव आहे, Theobrom cacao ग्रीक देवतेच्या नावावरून हे बेतले असून थीओब्रीम म्हणजे देवाचे अन्न. मात्र सर्वत्र प्रचलित असलेले नाव म्हणजे cocoa. ४ ते ८ मीटर उंच वाढणारे हे सदाहरीत झाड आहे. १० ते ४० सें.मी. लांब व ५ ते १५ सेंमी. रुंदीची देठाकडे व टोकाकडे निमुळती होत गेलेली एकांतरीत पाने. ही पाने किंचित वळीदार असून स्पर्शाला मऊ असतात. साधारणपणे डिसेंबर ते जानेवारी दरम्यान

याच्या खोडावर फुलांचे गुच्छ दिसू लागतात. ही फुले गुलाबी रंगाची व लांब दांड्या असलेली, चार पाकळ्यांची असतात. आकार १ ते २ सें.मी. या फुलांचे परागीकर मधमाशा किंवा फुलपाखरांद्वारे न होता ते अगदी बारीक असणाऱ्या विशिष्ट प्रकारच्या माशांमुळे होते. खोडावर गुच्छाच्या स्वरूपात फळे दिसू लागतात. पूर्णवाढ झाल्यानंतर ही फळे ३० ते ३५ सें.मी. पर्यंत लांबीची होतात. यांचा रंग सुरुवातीस हिरवा व पिकल्यानंतर गुलाबी, पिवळा होतो. फळ पूर्ण वाढ होऊन पिकण्याकरिता साधारण सहा महिने लागतात. या फळांमध्ये २० ते ६० पर्यंत तपकिरी रंगाच्या बिया निघतात. या बियांपासूनच कोको पावडर तयार करतात. तसेच कोको बटर तयार करतात. या दोन्ही पदार्थांना जगभर बरीच मागणी आहे

केरळ कर्नाटकप्रमाणे कोकणात देखील कोको पिकासाठी योग्य वातावरण आहे. या झाडांसाठी दमट हवामान व बाराही महिने पाणी आवश्यक आहे. त्यामुळे ज्यांच्याकडे ओलीताची व्यवस्था आहे त्यांनी याची लागवड करायला काहीच हरकत नाही. या झाडाला विरळ प्रकाश (५०%) हवा असतो. त्यामुळे नारळाच्या बागेत किंवा सुपारीच्या बागेत आंतर पिक म्हणून घेण्यात येते. जमीन किमान १.५ मी. पर्यंत भुसभुसीत व सुपीक हवी. वेगवेगळ्या प्रकारची सुपीक जमीन याला मानवते. मात्र समुद्र किनाऱ्यावरील रेतीमिश्रीत जमीन उपयोगाची नाही. याची लागवड बियांपासून तसेच कलमाद्वारे करता येते. कलमाद्वारे लावलेली झाडे २ वर्षात ३ मीटर पर्यंत वाढतात व ३ वर्षापासून फळे येण्यास सुरुवात होते. फळे आकाराने मोठी व वजनदार असल्याने खोडाच्या क्षमतेनुसारच फळे झाडावर ठेवणे उत्तम.

ज्यांच्याकडे सुपीक जमीन, दमट हवामान व ओलीताची सोय असेल व शेडनेट किंवा मोठी झाडे असतील त्यांनीही आपल्या बागेत या झाडाची लागवड करायला हरकत नाही. एक वेगळ्या प्रकारचे झाड, शिवाय घरीच चॉकलेट तयार करण्यासाठी लागणाऱ्या कोको पावडरसाठीही या झाडाची लागवड करता येते. शिवाय आपल्या दारातील झाडाचे फळ म्हणून त्याचे अप्रुप असेल ते वेगळेच.

**– प्रकाश दुधाळकर**
एफ–२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर–नवघर लिंक रोड,
मुलुंड (पू.), मुंबई – ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२

●●●

(पृष्ठ क्रमांक १० वरून - **नर्मदा परिक्रमा**)

होशंगाबाद स्टेशनचे सर्व प्लॅटफॉर्म वेटिंग रुम इत्यादी यात्रेकरूंनी भरलेल्या दिसल्या. मिळेल तिथे पथारी होती.

सचिंत होऊन मी बाहेर पडलो. स्टेशन जवळ धर्मशाळा आहे ती पाहिली तर १५० रु. त्यामुळे नदीघाटाकडे निघालो. जड्यांना फोन केला तेव्हा कळले की घाटावर धर्मशाळा भरलेल्या असतील तेव्हा स्टेशनजवळच लॉजवर राहावे. उद्या मंगळवर, (आज अमावास्या) काही पर्वकाळ असावा!

जवळच हाजुरी लॉजमध्ये ६० रु. कॉट या दराने वास्तव्य केले व डायरी लिहित आहे. खोल्या रिकाम्या नाहीत, जोखमीचे सामान सांभाळावे वा काही आम्हांजवळ ठेवावे असे व्यवस्थापकाने सांगितले.

१० खाटांच्या हॉलमध्ये फक्त दोनच (माझ्यासह) खाटा भरल्या आहेत. गादी, रजई व उशी मिळाली आहे. स्नानगृह इ. ठीक दिसतंय.

बाहेर थंडी आहे. पण हॉलमध्ये पंखा लावावा लागला.

**– अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

# अमेरिकेच्या व जगाच्या इतिहासातील एक महानायक : फ्रँकलिन डिलानो रुझवेल्ट

*अमेरिकेचे ३२ वे राष्ट्राध्यक्ष फ्रँकलीन डिलानो रुझवेल्ट यांच्या कारकीर्दीची व जीवनविषयी माहिती देणारा लेख – संपादक*

अमेरिकेच्या इतिहासात फ्रँकलिन डिलानो रुझवेल्ट यांचे एक आगळे–वेगळे स्थान आहे. फ्रँकलिन डिलानो रुझवेल्ट यांचा अमेरिकन जनता व त्यांचे चाहते 'एफ.डी. आर' असा उल्लेख करीत असत. किंबहुना आजही त्यांचे 'एफ. डी. आर.' हे संक्षिप्त नाव जनमानसामध्ये प्रसिद्ध आहे. फ्रँकलिन रुझवेल्ट १९३२ साली अमेरिकेत झालेल्या राष्ट्रध्यक्षीय निवडणूकीत निवडून आले व १९३३ साली त्यांनी राष्ट्राध्यक्ष पदाची सूत्रे हाती घेतली. १९३२ साली झालेल्या राष्ट्राध्यक्षीय निवडणूकीत ते डेमॉक्रेटीक पक्षाचे उमेदवार होते. फ्रँकलीन रुझवेल्ट यांनी तत्कालीन राष्ट्राध्यक्ष व रिपब्लीकन पक्षाचे उमेदवार हर्बट हूवर यांचा पराभव केला व ते अमेरिकेचे (अमेरिकेची संयुक्त संस्थाने) ३२ वे राष्ट्राध्यक्ष झाले. या निवडणूकीचा निकाल ८ नोव्हेंबर १९३२ रोजी जाहीर झाला व फ्रँकलिन रुझवेल्ट राष्ट्राध्यक्ष तर जॉन गार्नर हे उपराष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आल्याचे जाहीर करण्यात आले. फ्रँकलिन रुझवेल्ट यांना २२, ८२१, ८५७ तर हर्बट हूवर यांना १५, ७६१, ८४५ एवढी मते मिळाली. ही मते अमेरिकेतील सामान्य नागरिकांनी राष्ट्राध्यक्षीय निवडणूकीत दिलेली होती. येथे एक गोष्ट समजावून घेणे महत्त्वाचे आहे व ती म्हणजे अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष होण्यासाठी 'इलेक्टोरल कॉलेज' मधील एकूण मतांपैकी बहूमत मिळवणारी व्यक्ती वा उमेदवार राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आल्याचे घोषित केले जाते. अशी तरतूद अमेरिकेच्या राज्यघटनेत करण्यात आलेली आहेत. सध्या ह्या इलेक्टोरल कॉलेजमध्ये एकूण मतांची संख्या ५३८ एवढी असून कुठल्याही उमेदवाराला कमीत कमी २७० एवढी मते मिळाल्यावर ती व्यक्ती अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आल्याचे घोषित केले जाते. अमेरिकेतील प्रत्येक राज्यासाठी या इलेक्टोरल कॉलेजच्या मतांचा विशिष्ट कोटा ठरवण्यात आला आहे. उदाहरणच द्यावयाचे झाले तर कॅलिफोर्निया राज्याला ५५ मते, वॉशिंग्टन राज्याला १२ मते, फ्लोरिडा या राज्याला २९ मते, अशाप्रकारे विविध राज्यांना तेथील इलेक्टोरल कॉलेजच्या मतांचा कोटा वाटून दिलेला आहे. अमेरिकेच्या राज्यघटनेतील २३ व्या घटनादुरुस्तीनुसार अमेरिकेची राजधानी असलेल्या वॉशिंग्टन डी. सी. (डीस्ट्रीक्ट ऑफ कोलंबिया) या शहरासाठी इलेक्टोरल कॉलेजमध्ये ३ मतांचा कोटा प्रदान करण्यात आला आहे. काही वेळा असे झालेले आहे की एकूण जनतेने केलेल्या मतदानापैकी कमी मते मिळालेला परंतु इलेक्टोरल कॉलेजमध्ये बहुमत मिळालेला उमेदवार घटनेतील तरतूदीनुसार राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आल्याचे घोषित करण्यात आलेले आहे. याचे नजिकच्या काळातील उदाहरण म्हणजे जॉर्ज डब्लू बूश (ज्यूनियर) हे होत.

इसवी सन २००० मध्ये ज्यूनियर बूश साहेब अमेरिकेचे ४३ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आले होते. या निवडूकीदरम्यान डेमॉक्रेटीक पक्षाचे अल गोर (Al Gore) जॉर्ज बूश ज्यूनियर यांच्या विरोधात लढत देत होते. या निवडणूकीत अल गोर यांना सामान्य जनतेने केलेल्या मतदानात बहुमत मिळाले होते. परंतु जॉर्ज बूश यांना इलेक्टोरल कॉलेजमधील जास्त मते मिळाली होती. त्यामुळे २००० साली लागलेल्या निवडणूकीच्या निकालात अमेरिकेच्या राज्यघटनेनुसार जॉर्ज बूश ज्यूनियर यांना राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आल्याचे घोषित करण्यात

सहिष्णुता ही औदार्यातून निर्माण होते. – सर्वेंटिस

आले होते. अशा जनतेचे बहुमत नसलेल्या, मात्र इलेक्टोरल कॉलेजमध्ये बहुमत असलेल्या राष्ट्राध्यक्षांना अमेरिकेत 'मायनॉरिटी प्रेसिडेंट' म्हणजेच उल्प मतातील राष्ट्राध्यक्ष असे म्हटले जाते! १९३२ साली अमेरिकेतील ४८ राज्यांतील इलेक्टोरल कॉलेजमधील एकूण मतांची संख्या ५३१ एवढी होती. यापैकी माननीय रुझवेल्ट यांना ४२ राज्यांतील ४७२ तर हर्बट हूवर यांना उर्वरित ६ राज्यांतील ५९ एवढी मते मिळाली होती. मतांच्या या आकडेवारीनुसार १९३२ सालच्या राष्ट्राध्यक्षीय निवडणूकीत फ्रँकलिन रुझवेल्ट यांना जनतेने केलेले मतदान व इलेक्टोरल कॉलेजमधील मते या दोन्ही पातळींवर स्पष्ट बहुमत मिळाले होते असे लक्षात येते. १९२० नंतर १९३२ साली बारा वर्षांच्या कालावधी नंतर म्हणजेच जवळ जवळ एक तपानंतर रुझवेल्ट यांच्या रुपाने डोमॉक्रेटिक पक्षाचा उमेदवार अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आला होता. रुझवेल्ट यांच्या या विजयाला त्यांचे स्वतःचे व्यक्तिमत्त्व, वैचारिक प्रगल्भता व १९२० ते १९३२ या १२ वर्षांच्या कालावधीत रिपब्लिकन पक्षाच्या राष्ट्रांध्यक्षांनी केलेल्या काही चुकादेखील कारणीभूत होत्या यात वाद नाही. १९२० साली रिपब्लिकन पक्षाचे वॉरेन हार्डींग्ज (Warren Harding) हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आले होते. याच हार्डींग्ज साहेबांनी अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष वूड्रो विल्सन यांचा अमेरिकेच्या सीनेटमध्ये पहिल्या महायुद्धानंतर जर्मनी सोबत केल्या जाणाऱ्या व्हर्सायचा तह पास होण्याचा मार्ग रोखला होता. असे म्हटले जाते की, राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आल्यावर हार्डींग्ज यांनी आपल्या जवळच्या खास लोकांची वर्णी मंत्रिमंडळात व इतर महत्त्वाच्या सरकारी पदांवर लावलेली होती. हार्डींग्ज यांच्या याच 'खास' लोकांनी त्याकाळात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केल्याचे म्हटले जाते. शेवटी हार्डींग्ज यांचा हृदयविकाराच्या झटक्याने २ ऑगस्ट १९२३ रोजी सॅनफ्रँसिस्को येथील पॅलेस हॉटेलमध्ये अचानकपणे मृत्यू झाला व तत्कालीन उपराष्ट्राध्यक्ष कॅल्वीन कूलीज (Calvin Coolidge) हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बनले. येथे वाचकांना अमेरिकेच्या राष्ट्रध्यक्ष पदाबाबतची एक वेगळी माहितीसुद्धा द्याविशी वाटते. ही माहिती अशी की, अमेरिकेच्या राज्यघटनेनुसार निवडून आलेल्या राष्ट्राध्यक्षाचे राष्ट्रध्यक्षपदाची कारकीर्द संपण्यापूर्वी राष्ट्राध्यक्ष म्हणून कार्यरत असताना निधन झाल्यास तत्कालीन उपराष्ट्राध्यक्ष अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बनतात. जर उपराष्ट्राध्यक्षांचाही मृत्यू झाला तर अमेरिकेच्या काँग्रेसच्या (संसदेच्या) कनिष्ठ दालनाचे (हाऊस ऑफ रिप्रेझेंन्टेटिव्ज्) सभापती राष्ट्राध्यक्ष बनतात. असो. कॅल्वीन कूलीज यांनी स्वतःला एक चांगले राष्ट्राध्यक्ष म्हणून सिद्ध केले. कूलीज यांच्या राष्ट्राध्यक्ष पदाच्या कारकीर्दीत अमेरिकेतील उद्योगधंद्यांना व एकंदरीतच अर्थव्यवस्थेला चांगले दिवस येऊन त्यांची भरभराट झाली. कूलीज यांच्या धोरणांमुळे अमेरिकेचे राष्ट्रीय उत्पन्न वाढल्याचे व अमेरिकन लोकांचे राहणीमान उंचावल्याचे लक्षात येते. कूलीज यांनी त्यांच्या कारकीर्दीत कारखानदारीला प्रोत्साहन दिल्याचे त्यांच्या पुढील विधानावरून लक्षात येते – 'The man who builds a factory, builds a temple, that the man who works there worships there' या विधानाचा मराठीमध्ये ढोबळमानाने अर्थ 'जी व्यक्ती कारखाना उभारते ती व्यक्ती मंदिर बांधण्याचे काम करित असते, तर जी व्यक्ती या मंदिररुपी कारखान्यात काम करते ती तेथे देवाची पूजा करीत असते', असा होईल. कूलीज यांच्या राष्ट्राध्यक्ष पदाच्या कारकीर्दीत अमेरिकेने 'न भूता न भविष्यती' अशी आर्थिक प्रगती केली असे म्हणणे वावगे ठरणार नाही. १९२० ते १९२९ या ९ वर्षांच्या कालावधीत अगोदरच नमूद केल्याप्रमाणे सामान्य माणसाचे राहणीमान निश्चितच उंचावलेले होते. लोकांना नोकऱ्या मिळत होत्या व त्यांचे पगारही वाढत होते. तर सर्वात महत्त्वाचे म्हणजे अमेरिकेतील बँका लोकांना घरे, मोटारगाड्या व इतर चैनीच्या वस्तू विकत घेण्यासाठी कर्ज देण्यास तयार होत्या, नव्हे देत होत्या. या

कालावधीत अनेक अमेरिकन लोकांनी फोर्ड या कंपनीच्या मॉडेल–टी (Model-T) या गाड्या विकत घेतल्या होत्या. किंबहुना ते ह्या गाड्या विकत घेऊ शकत होते. याचे कारण म्हणजे एकतर त्यांची आर्थिक स्थिती सुधारली होती व त्यांना वस्तू विकत घेण्यासाठी बँका कर्ज देत होत्या. अमेरिकच्या अर्थव्यवस्थेत तेजी आलेल्या या कालावधीला आर्थिकदृष्ट्या 'गर्जणारे १९२० चे दशक' (Roaring 20s) असे देखील म्हटले जाते. १९२८ साली रिपब्लिकन पक्षाचे हर्बट हूवर हे अमेरिकेचे ३१ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आले. त्यावेळी फार कमी लोकांना वाटले असेल की अमेरिकेने साध्य केलेली ही अफाट आर्थिक प्रगती म्हणजे एक मृगजळ होय व हा फूगा कधीही फुटू शकतो. मात्र असे म्हणतात की, विधिलिखित गोष्टी कोणीही टाळू शकत नाही व काही चुकीच्या गोष्टींमुळे काही चांगल्या गोष्टी घडल्या असतील तर त्या दीर्घकाळ टिकू शकत नाहीत. अगदी याच उक्तीप्रमाणे १९२० ते १९३० या कालावधीत जरी अमेरिकेची आर्थिक भरभराट झाली होती तरी अर्थशास्त्रीय दृष्टीने अनेक चुका देखील करण्यात आल्या होत्या. या चुकांचा परिणाम म्हणूनच १९२९ साली अमेरिकेचा शेअरबाजार गडबडला व अमेरिकेच्या आर्थिक इतिहासातील काळ्याकुट्ट अशा आर्थिक महामंदीची सुरुवात झाली.

२४ ऑक्टोबर १९२९ व २९ ऑक्टोबर १९२९ हे दोन दिवस अमेरिकेच्या इतिहासात अनुक्रमे 'काळा गुरुवार' व 'काळा मंगळवार' म्हणून ओळखले जातात. कारण ह्या दोन दिवसांअखेर अमेरिकेच्या शेअर बाजारात विकल्या गेलेल्या (लोकांनी घाबरून जाऊन पडेल त्या किंमतीला विकलेल्या) शेअर्सची संख्या अनुक्रमे ६३,७४,९६० व १६,४१०,०३० एवढी होती. याचाच अर्थ अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेची घडी विस्कटायला सुरुवात झाली. शेअर बाजारात विविध कंपन्यांच्या रोख्यांचे म्हणजेच शेअर्सचे भाव धडाधड कोसळायला लागले व अनेक लोकांचे लक्षावधी नव्हे कोट्यावधी डॉलर्स बुडण्यास सुरुवात झाली. हर्बट हूवर यांची शैक्षणिक पार्श्वभूमी अभियांत्रिकीची म्हणजेच 'इंजिनिअरिंगची' होती. परंतु ह्या 'इंजिनियरला' अमेरिकेची पत्त्यासारखी कोसळणारी अर्थव्यवस्था वाचवता आली नाही हे अमेरिकेच्या इतिहासातील एक कटू सत्य होय.

आर्थिक महामंदीमुळे अमेरिकेची सदृढ अर्थव्यवस्था पत्त्यांच्या डोलाऱ्याप्रमाणे कोसळल्याचे आपल्या निदर्शनास येते. शेअर बाजारात विविध कंपन्यांच्या रोख्यांच्या किंमती अत्यंत वेगाने पडत आहेत व शेअर बाजाराच्या निर्देशांकात घटकेगणिक उतरण होत आहे हे समजल्यावर तर अनेक लोकांनी धडाधड आपले रोखे विकण्यास सुरुवात केली व त्यामुळे रोख्यांच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात घट होऊ लागली. अवघ्या काही दिवसांतच अमेरिकेतील अनेक लोकांनी शेअर बाजारातील आपली गुंतवणूक गमावली व ते अक्षरशः कंगाल झाले. सामान्य लोकांप्रमाणेच अमेरिकेतील अनेक बँकांनीसुद्धा त्यांच्याकडे जनतेच्या ठेवी स्वरूपातील असलेला पैसा शेअर बाजारात गुंतवलेला होता. त्यामुळे शेअर बाजार कोसळण्यास सुरुवात झाल्यावर अमेरिकेतील बऱ्याच बँकांचा पैसा बुडाला व अशा बँकांना टाळे ठोकण्यापासून दुसरा पर्याय उरला नाही. बँका बंद पडल्या ह्याच्यापेक्षा त्या बंद पडल्यामुळे अमेरिकेतील सामान्य माणसाने घाम गाळून कमावलेला पैसा जो त्याने ठेवींच्या रुपात बचत करण्यासाठी म्हणून बँकांत ठेवला होता तो पैसा बुडाला ही खेदाचीच नव्हे तर चिंताजनक बाब होती. आर्थिक महामंदीमुळे अमेरिकेतील बँकिंग व्यवस्था वा प्रणाली पूर्णपणे कोलमडून पडली. ह्या जवळ–जवळ मृत पावलेल्या बँकांना पुनर्ज्जीवीत करण्यासाठी फ्रँकलीन रुझवेल्ट यांना १९३२ साली राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आल्यावर विशेष उपाययोजना करावी लागली. रुझवेल्ट प्रशासनाने आर्थिक मदत केल्यामुळेच वा अनुदान दिल्यामुळेच अनेक बंद पडलेल्या बँका पुन्हा सुरू होऊ शकल्या. मात्र, ह्या पुन्हा सुरू झालेल्या बँकांमध्ये आपला पैसा

ठेवण्यास अमेरिकन जनता धजावत नव्हती. त्यामुळे फ्रँकलीन रुझवेल्ट यांना आपल्या एका 'फायर साईड चॅट' मध्ये "I can assure you that it is safer to keep your money in a reopened bank than under the mattress." (मी तुम्हाला आश्वस्त करू इच्छितो की, तुमचा पैसा बिछान्याखाली ठेवण्यापेक्षा पुन्हा एकदा नव्याने सुरू झालेल्या बँकांमध्ये ठेवणे जास्त सुरक्षित आहे) असे आवर्जून सांगावे लागले. रुझवेल्ट यांनी असे विधान केल्यावरच अमेरिकन लोकांनी पुन्हा एकदा आपला पैसा बँकांमध्ये ठेवण्यास सुरू केला ही सत्यस्थिती होती.

१९२९ च्या आर्थिक महामंदीमुळे अमेरिकेमध्ये हाहाःकार उडवून दिला होता. सर्वत्र हालाखी, बेकारी व अतिशय भयानक दारिद्र्यमय जीवन जाणवत होते. अनेक लोकांना दोन वेळचे जेवण मिळणेसुद्धा भयंकर कठीण होऊन बसले होते. ह्या सर्व प्रकारामुळे अनेक संस्थांनी लोकांना मोफत ब्रेड देण्यास वा जेवण देण्यास सुरुवात केली होती. अनेक अमेरिकन लोक इच्छा नसताना सुद्धा लाजत लाजत अशा अन्नछत्रांमधून आपली भूक भागविण्यासाठी रांगेत उभे असलेले दृश्य त्यावेळेस अमेरिकेच्या अनेक शहरांमध्ये दिसत असे! काही लेखकांनी तर असे वर्णन केले आहे की, बरेच अमेरिकन लोक आपली भूक भागविण्यासाठी कचराकुंडीतून टाकून दिलेले सडके अन्न व फळे उकरून वा शोधून खात असत! अनेक लोक आपले 'घर विकणे आहे', 'गाडी विकणे आहे' वा इतर वस्तू विकावयाच्या आहेत असे फलक घेऊन उभे राहात जेणेकरून त्यांच्या मालकीच्या अशा वस्तू विकून दोन पैसे येतील व त्यांना खावयास निदान एकवेळचे अन्न तरी मिळेल ही त्यामागची भूमिका होती. मात्र, त्यांचे वा अनेकांचे असे दुर्दैव होते की, त्यांच्या वस्तू विकत घेण्यासाठी इतरांकडेदेखील पैसे नव्हते. त्यामुळे अनेक लोकांवर अक्षरशः उपासमारीची वेळ आली होती. अशा ह्या भयानक आर्थिक महामंदीचे सावट संपूर्ण अमेरिकेवर असताना अमेरिकन जनतेला फ्रँकलिन रुझवेल्ट यांच्या रुपात त्यांचा तारणहार दिसला. ह्याचे तसे सबळ कारण देखील होते व हे कारण म्हणजे जेव्हा आर्थिक महामंदीची सुरुवात झाली तेव्हा फ्रँकलीन रुझवेल्ट हे न्यूयॉर्क ह्या राज्याचे राज्यपाल – गव्हर्नर (Governor) होते व त्यांनी राज्यपाल या नात्याने न्यूयॉर्क राज्यात आर्थिक महामंदीपासून लोकांना व प्रामुख्याने बेकारांना दिलासा देण्यासाठी अनेक उपाययोजना व प्रयत्न केले होते. तसेच १९३२ च्या निवडणूकीच्या प्रचारादरम्यान फ्रँकलिन यांनी ठासून सांगितले की, 'आर्थिक महामंदीमुळे अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेची घडी विस्कटलेली असताना देशाचे सरकार देशाला व जनतेला वाऱ्यावर सोडून बघ्याची भूमिका घेऊ शकत नाही. सरकारने व प्रामुख्याने राष्ट्राध्यक्षांनी राष्ट्राला आर्थिक महामंदीतून सावरण्यासाठी ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे' अशी भूमिका रुझवेल्ट यांनी मांडली. त्यामुळे जनतेला महामंदीमय अंधकारात कुठेतरी फ्रँकलिन यांच्या रुपाने आशेचा किरण दिसला व जनतेने त्यांना भरघोस मते देऊन आपला ३२ वा राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून दिले. फ्रँकलीन यांनीसुद्धा जनतेने त्यांच्यावर दाखविलेला हा रास्त विश्वास आपल्या 'न्यूडील' ह्या आर्थिक नीतींच्या माध्यमातून खरा करून दाखवला. आपण 'न्यूडील' संदर्भात पुढे ऊहापोह करणारच आहोत.

फ्रँकलिन रुझवेल्ट यांचा जन्म ३० जानेवारी १८८२ रोजी न्यूयॉर्क राज्यातील न्यूयॉर्क शहरालगत हाइड पार्क येथील स्प्रिंगवूड या ठिकाणी त्यांच्या वडिलोपार्जीत इस्टेटीवर झाला. रुझवेल्ट यांचे पूर्वज 'डच' वंशाचे म्हणजेच मुळचे युरोपमधील नेदरलँड या देशातले होते. अमेरिकेतील रुझवेल्ट यांची वंशावळ क्लेस मार्टेनसेन वॅन रुझवेल्ट (Klaes Martensen Van Roosevelt) यांच्यापासून सापडायला सुरुवात होते. हे वॅन रुझवेल्ट १६४० च्या दशकात न्यूयॉर्क शहरात येऊन स्थायिक झाले होते वा वसले होते. त्यावेळी न्यू यॉर्कचे नाव न्यू ॲमस्टरडॅम होते व तेथे 'डच' लोकांची संख्या लक्षणीय होती. फ्रँकलिन रुझवेल्ट यांच्या वडिलांचे नाव जेम्स तर आईचे नाव सारा होते. ह्या रुझवेल्ट घराण्याने

अमेरिकेला दोन राष्ट्राध्यक्ष दिलेले आढळतात. अमेरिकचे २६ वे राष्ट्राध्यक्ष थिओडर रुझवेल्ट १९०१ ते १९०९ (Theodore Roosevelt) हे फ्रँकलीन यांच्याच वंशावळीतले होते. रुझवेल्ट कुटुंबातून बनलेले अमेरिकेचे दुसरे राष्ट्राध्यक्ष म्हणजे खुद्द फ्रँकलिन रुझवेल्ट होत. थिओडर रुझवेल्ट हे विल्यम मॅकेनले (William McKinley) यांच्या सोबत १९०० साली झालेल्या निवडणुकांमध्ये उपराष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आले होते. परंतु सप्टेंबर १९०१ मध्ये विल्यम मॅकेनले यांची हत्या झाल्यानंतर अमेरिकेच्या राज्यघटनेतील तरतुदीनुसार उपराष्ट्राध्यक्ष ह्या नात्याने अमेरिकेचे २६ वे राष्ट्राध्यक्ष झाले व १९०४ साली झालेल्या राष्ट्राध्यक्षीय निवडणूकीत ते रिपब्लीकन पक्षाच्या उमेदवारीवर राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आले. थिओडर रुझवेल्ट यांच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या कालावधीतील दोन महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे त्यांनी १९०४-०५ साली रशिया व जपान या राष्ट्रांमध्ये झालेल्या युद्धात यशस्वीपणे मध्यस्थी करून हे युद्ध पोर्टस्माऊथच्या तहानुसार (Treaty of Portsmouth) थांबविण्यास मदत केली. तसेच ह्यांच्याच काळात प्रशांत महासागर व अटलांटीक महासागर यांना जोडणारा ४८ मैलांचा पनामा कालवा बांधण्याचे कामदेखील सुरू झाले होते. असो. जेम्स रुझवेल्ट व सारा रुझवेल्ट यांच्या वयात जवळ जवळ २६ वर्षांचा फरक होता. जेम्स ह्यांना त्यांच्या पहिल्या पत्नीपासून म्हणजेच रिबेका ब्रायन होलंड (Rebecca Brien Howland) पासून एक मुलगा झालेला होता व त्याचे नाव जेम्स रुझवेल्ट असे होते. ह्या जेम्स रुझवेल्टला 'रोजी' (Rosey) असेदेखील संबोधले जाई. जेम्स रुझवेल्ट थोरले हे एक गर्भश्रीमंत व्यक्तिमत्त्व होते. ते डेलवेर अँड हडसन रेल्वे (Delware and Hudson Railway) ह्या लोहमार्गाचे उपाध्यक्ष होते. फ्रँकलिन यांची आई सारासुद्धा डिलॅनो (Delano) ही सधन कुटुंबातून आलेली होती. जेम्स व सारा यांना आपला मुलगा फ्रँकलिन याच्याविषयी जिव्हाळा, आत्मियता व खूप प्रेम वाटत असे. सारा यांचा कटाक्ष असे की, फ्रँकलिनने कुठलेही काम नियमानुसार व वेळापत्रकाप्रमाणे करावे. त्यामुळेच त्यांनी फ्रँकलिनचे खाणे, अभ्यास, खेळणे इत्यादी गोष्टींचे एक वेळापत्रक बनवलेले होते. फ्रँकलिनने ह्या सर्व गोष्टी नियोजित वेळापत्रकाप्रमाणेच कराव्यात यासाठी त्या आग्रही असत. त्यामुळे फ्रँकलिन यांची आई एकप्रकारे त्यांच्यावर वर्चस्व गाजवते असे अनेक लोकांना व खुद्द त्यांची पत्नी एलेनार (Eleanor) हिलासुद्धा वाटत असे. परंतु फ्रँकलिन आपल्या आईची आज्ञा अपवादानेच वा क्वचितच मोडत असत. उलट त्यांना त्यांच्या आईच्या आज्ञेत राहण्यातच जास्त आनंद मिळत असे, असे म्हणणे वावगे ठरू नये. फ्रँकलिन यांना चांगलेच ठाऊक होते की, त्यांच्या आईचे त्यांच्यावर अपार प्रेम आहे व त्यांच्या भल्यासाठीच त्यांची आई सारा त्यांना हे सर्व सांगत असते ह्याचीसुद्धा जाण होती. त्याचप्रमाणे आईने प्रेमळपणे दिलेला एखादा वा कोणताही सल्ला केव्हा व कसा डावलावा हेदेखील त्यांना अवगत होते! याचाच अर्थ, ते त्यांच्या अतिउपयोगाचे सल्लेच प्रकर्षाने पाळत हे नंतर नंतर त्यांच्या पत्नीच्या म्हणजेच एलेनारच्यासुद्धा लक्षात येत होते.

फ्रँकलिन यांच्या आईवडिलांनी त्यांच्यावर लहानपणापासूनच सुसंस्कार केले होते. पिता जेम्स फ्रँकलिन यांनी आपल्या श्रीमंतीचा उपयोग इतरांना मदत करण्यासाठी करावा अशा प्रकारची शिकवण आपल्या मुलाला दिली होती. त्यामुळेच फ्रँकलिन यांना रंजल्या गांजलेल्यांविषयी आयुष्यभर सहानुभूती वाटत असे यात वाद नाही. जेम्स व सारा रुझवेल्ट, फ्रँकलिन यांचे व्यक्तिमत्त्व प्रगल्भ व्हावे म्हणून त्यांना लहानपणी युरोपमधील विविध देशांच्या सफारीवर घेऊन जात असत. फ्रँकलिन यांना इंग्रजीप्रमाणेच जर्मन व फ्रेंच ह्या दोन भाषा अस्खलीतपणे बोलता तसेच लिहितादेखील येत. वयाच्या १४ व्या वर्षांपर्यंत फ्रँकलिन यांचे शिक्षण खाजगी शिक्षकांच्या देखरेखी खाली झाले होते. वयाच्या १४ व्या वर्षी फ्रँकलिन यांना मॅसॅच्यूसेट्स् (Massachusetts)

---

सामान्य लोक आपला वेळ कसा घालवावा याचा विचार करतात; पण
बुद्धिमान लोक त्याचा उपयोग करण्याचा प्रयत्न करतात. - स्कॉपनहॉवर

या पूर्वेकडील (साधारणतः अमेरिकेच्या ईशान्येकडील म्हणता येईल) राज्यातील ग्रोटोन ह्या प्रसिद्ध शाळेत घालण्यात आले. ह्या शाळेची स्थापना १८८४ साली रेव्हरंड एंडिकॉट पीबडी (Reverend Endicott Peabody) यांनी केली होती. ह्या ग्रोटोन शाळेत शिकलेल्या बऱ्याच विद्यार्थ्यांनी नंतरच्या काळात विविध क्षेत्रात मोठे नाव कमावलेले आढळते. फ्रँकलिन यांच्याप्रमाणेच डीन ॲकसन (Dean Acheson) हेसुद्धा ह्याच शाळेत शिकलेले होते. हे डीन ॲकसन फ्रँकलीन यांच्यानंतर राष्ट्राध्यक्ष झालेल्या हॅरी ट्रूमन यांच्या मंत्रीमंडळात परराष्ट्र मंत्री होते. १९०० सालात फ्रँकलिन यांनी ग्रोटोन येथील शिक्षण पूर्ण केले व नंतर त्यांनी जगप्रसिद्ध अशा हार्वड विद्यापीठात प्रवेश घेतला व १९०३ साली त्यांनी आपले पदवीचे शिक्षण पूर्ण केले. फ्रँकलिन यांनी आपली पदवी इतिहास ह्या विषयात घेतलेली होती. आपल्या महाविद्यालयीन जीवनात त्यांनी 'हार्वड क्रिमसन' (Harvard Crimson) ह्या महाविद्यालयीन नियतकालिकाचे संपादनदेखील केले होते. याचा त्यांना आयुष्यभर अभिमान होता. १९०४ साली त्यांनी कायद्याचे शिक्षण घेण्यासाठी अमेरिकेतील कोलंबिया (Columbia) ह्या अजून एका प्रसिद्ध विद्यापीठात प्रवेश घेतला होता. परंतु फ्रँकलिन कायद्याची पदवी घेऊ शकले नाहीत. त्यांनी सुरुवातीच्या काळात न्यूयॉर्क शहरातील एका कायदेविषयक कामे करणाऱ्या संस्थेमध्ये वा कंपनीमध्ये (Law firm) काम केले होते. मात्र, फ्रँकलिन यांना कायद्याच्या क्षेत्रात जास्त रस वाटला नाही असे आपल्या लक्षात येते.

फ्रँकलिन यांची पत्नी एलेनार रुझवेल्ट (Eleanor Roosevelt) हीसुद्धा एक सुशिक्षित, सुलक्षणी व गोरगरीब, तसेच समाजातील पीडीतांविषयी आस्था व कनवाळूपणा असणारी स्त्री होती. याचा प्रत्यय आपणास एलेनार यांनी मरियन अँडरसन (Marian Anderson) ह्या कृष्णवर्णीय गायिकेला केलेल्या मदतीवरून व तिला वर्णद्वेषी गोऱ्या लोकांच्या विरोधात दिलेल्या पाठिंब्यावरून येतो. एलेनार यांचा जन्म १८८४ साली झाला होता. एलेनार ही अमेरिकेचे रिपब्लीकन पक्षाचे २६ वे राष्ट्राध्यक्ष थिओडर रुझवेल्ट यांची सख्खी पुतणी होती. एलेनार व फ्रँकलीन यांची लहानपणापासूनच ओळख व मैत्री होती. कालांतराने ह्या मैत्रीचे रुपांतर प्रेमात झाले व १९०५ साली हे सुंदर जोडपे विवाहबद्ध झाले. फ्रँकलिन यांची आई सारा हिला सुरुवातीस फ्रँकलिनने एलेनार सोबत विवाह करणे आवडले नव्हते. परंतु फ्रँकलिन व एलेनार यांचे एकमेकांवरील उत्कट प्रेम पाहून नंतरच्या काळात सारा यांची ह्या विवाहाविषयी असलेली नाराजी मावळली व त्यांनी एलेनारचा आपली स्नूषा म्हणून स्वीकार केला असे निदर्शनास येते. फ्रँकलिन व एलेनार यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे हे दोघेही राजकीयदृष्ट्या जरी डेमॉक्रेटीक (Democratic) पक्षाशी बांधील असले तरी त्यांचे 'टेडी अंकल' सोबत म्हणजेच थिओडर रुझवेल्ट (हे रिपब्लीकन पक्षाचे होते) यांच्यासोबत फार जिव्हाळ्याचे संबंध होते. थिओडर, फ्रँकलिन व एलेनार रुझवेल्ट यांनी आपल्या वेगवेगळ्या राजकीय विचार प्रणाल्यांमुळे एकमेकांच्या वैयक्तिक संबंधामध्ये वितुष्ट येणार नाही ह्याची खबरदारी घेतलेली आढळते. थिओडर यांनी तर फ्रँकलिन व एलेनारच्या विवाहात स्वतः 'कन्यादान' केले होते. थिओडर रुझवेल्ट हे आपले नातेवाईक अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाले याचा फ्रँकलिन व एलेनार यांना त्यावेळेस रास्त अभिमान वाटला होता.

फ्रँकलिन व एलेनार यांना सहा मुलं (अपत्य) होती. त्यांची नावं पुढीलप्रमाणे आहेत – ॲना एलेनार – १९०६ ते १९७५ (Anna Eleanor - 1906-1975), जेम्स १९०७ ते १९९१ (James - 1907-1991) फ्रँकलिन डिलॅनो ज्यूनिअर–१९०९ (Franklin Delano Junior - 1909 – फ्रँकलिन व एलेनारच्या ह्या मुलाचे जन्मानंतर अल्पशा काळातच निधन झाले.) इलियट – १९१० ते १९९० (Elliot - 1910-1990), फ्रँकलिन डिलानो ज्युनिअर – १९१४–१९८८ (Franklin Delano Junior - 1914-1981), जॉन – १९१६–१९८१

ज्याने वेळ वाया घालवला, त्याच्याजवळ गमवायला काहीही उरत नाही. – थॉमस फुलर

(John - 1916-1981). फँकलिन यांचे इलियट, जेम्स, फ्रँकलिन (ज्युनियर) व जॉन हे चारही मुलगे अमेरिकेच्या सैन्यदलात होते. इलियट हा हवाई दलात, जेम्स मरीन्समध्ये तर फ्रँकलिन (ज्युनियर) व जॉन हे दोघे नौसेनेत होते. ह्या चौघांनीही दुसऱ्या महायुद्धादरम्यान विविध लढायांमध्ये सहभाग घेतला होता. परंतु फ्रँकलिन यांच्या राजकीय विरोधकांनी हे चौघे राष्ट्राध्यक्षांची मुलं असल्यामुळे त्यांना विशेष वागणूक मिळते अशी हीन दर्जाची टीका केली होती. त्यामुळे इलियट तर फार नाराज व दुःखी झाला होता. नंतरच्या काळात फ्रँकलिन यांच्या सहा अपत्यांपैकी फ्रँकलिन डिलॅनो ज्युनिअर व जेम्स हे दोघे अमेरिकेच्या संसदेचे कनिष्ठ दालन– हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ज् (House of Representatives) चे सदस्य देखील झाले होते. फ्रँकलिन यांना एकंदरीत १३ नातवंडे होती असा उल्लेख काही ग्रंथांमध्ये सापडतो. फ्रँकलिन हे एक अतिशय प्रेमळ पिता व आजोबा होते. राष्ट्राध्यक्ष झाल्यावर सुद्धा ते आपल्या व्यस्त वेळापत्रकातून चिमुकल्या रुझवेल्ट मंडळींसाठी आवर्जून वेळ काढत असत. ते रुझवेल्ट कुटुंबातील लहान मुलांचा प्रेमाने 'चिक्स' (Chicks) असा उल्लेख करत असत. त्यांनी मुलांसाठी आपल्या वेळापत्रकात जो नियोजित वेळ ठेवलेला असेल तो पूर्णवेळ ते मुलांसोबत आवर्जून घालवत असत. मुलांसाठी खास ठेवलेल्या वेळास ते 'चिल्ड्रेन्स अवर' (Childrens' Hour) म्हणत असत व ह्यावेळात ते सहसा कुणासही भेटत नसत. त्यांना मुलांसोबत खेळणे व गोष्टी सांगणे आवडत असे. फ्रँकलिन व एलेनार यांचा एकप्रकारे प्रेमविवाह होता. कारण जरी हे दोघे एकमेकांच्या नात्यातील होते तरी विवाहापूर्वीच त्यांचे प्रेमप्रकरण सुरू झाले होते व त्यांनी ह्या प्रेमातूनच एकमेकांशी विवाहबद्ध होण्याचा निर्णय घेतला होता. ह्या एकमेकांवर जीवापाड प्रेम असणाऱ्या जोडप्यांदरम्यान नंतरच्या काळात एक मोठी दरी निर्माण झालेली आढळते. याचे कारण म्हणजे फ्रँकलिन यांचे काही स्त्रियांसोबत जमलेले प्रेमसंबंध होत. फ्रँकलिन यांचे विवाहानंतरचे सर्वात प्रसिद्ध प्रेमप्रकरण म्हणजे ल्युसी मर्सर (Lucy Mercer) हिच्या सोबतचे प्रेमप्रकरण होय. महत्त्वाचे म्हणजे ही ल्युसी मर्सर एकेकाळची एलेनारची 'सोशल सेक्रेटरी' (Social Secretery) होती. फ्रँकलिन ह्यांचा १२ एप्रिल १९४५ ह्या दिवशी त्यांच्या जॉर्जिया ह्या राज्यातील वॉर्मस्प्रिंग्ज (Warm Springs) ह्या ठिकाणी मृत्यू झाला तेव्हा ल्युसी मर्सर ही तेथे हजर होती. हे कळल्यावर एलेनार फार नाराज झाली होती व ह्या एकंदरीतच प्रेमप्रकरणाने तिच्या हृदयावर कधीही भरून न निघणारी खोल जखम झाली होती यात वाद नाही. एलेनारच्या ह्या मनस्थितीचे वर्णन श्रीमती ज्योत्स्ना लेले यांनी आपल्या 'फ्रँकलिन रुझवेल्ट – अमेरिकेचा तारणहार ठरलेल्या जिद्दी नेत्याची यशोगाथा' ह्या पुस्तकात केलेले आहे. हे पुस्तक पुणे स्थित राजहंस प्रकाशन प्रा. लि. ह्या प्रसिद्ध प्रकाशन संस्थेने प्रकाशित केले आहे. ह्या पुस्तकाची प्रथमावृत्ती जानेवारी २०११ मध्ये आली होती. हे पुस्तक वाचकांनी जरूर वाचावे. ह्या पुस्तकातच एलेनार यांना फ्रँकलिन यांच्या ल्युसी मर्सर सोबतच्या प्रेमप्रकरणाचा किती मानसिक त्रास झाला होता याची प्रचीती श्रीमती लेले यांनी एलेनारच्या आत्मचरित्रातील काही उतारे देऊन करून दिलेली आहे. वाचकांसाठी सदर उतारे खाली उद्धृत करीत आहोत.

''ज्या सर्वांना माझा नवरा सामर्थ्य व भरभक्कम आधार यांचं प्रतीक होता, त्या सर्वांसाठी त्याचा मृत्यू ही दुःखदायक गोष्ट आहे. पुढे कधीतरी मला काही अडचणींना तोंड द्यावं लागेल, पण एखादा माणूस जसा असेल तसा त्याचा स्वीकार करायला हवा, जसं आयुष्य वाट्याला येईल तसं जगायला हवं...''

''सर्व प्राणिमात्रांना भावना असतात. गरजा, आकर्षण असतं. स्त्री–पुरुष जेव्हा पुष्कळ वर्ष एकत्र घालवतात, तेव्हा त्यांना एकमेकांच्या उणिवांची जाणीव होते; पण चांगल्या गोष्टींचा आदर करायचंही समजतं.

त्याला जर अजिबात चिकित्सक नसलेली बायको

---

काळ हा अखंड वाहणाऱ्या झऱ्याप्रमाणे सर्व जणांना पुढे लोटत नेतो आणि रात्रीचे स्वप्न जसे सकाळी विसरले जाते त्याप्रमाणे त्याचे पलायन कोणाच्या ध्यानात राहात नाही. – वॅट्स

मिळाली असती, तर तो अधिक सुखी झाला असता आणि तशी मी नसल्यामुळे त्याला दुसऱ्या लोकांच्या मैत्रीचा आधार घ्यावा लागला.''

आपली आई एलेनार हिला फ्रँकलिन व ल्युसी प्रेमप्रकरणाचा खूप त्रास झाला होता अशी कबुली ह्या दोहोंची कन्या ॲना रुझवेल्ट हिनेसुद्धा दिलेली आढळते. ज्युसी प्रकरणामुळे एलेनारने फ्रँकलिनपासून काडीमोड वा घटस्फोट घेण्याचा देखील विचार केला होता. मात्र, एलेनारची सासू व फ्रँकलिनची आई सारा हिने तेव्हा वेळीच मध्यस्थी केल्यामुळे हा विवाह टिकून राहिला होता. एवढेच नव्हे तर साराने आपला लाडका पुत्र फ्रँकलिन याची ल्युसी प्रेमप्रकरणावरून चांगलीच कान उघडणीदेखील केली होती. असो.

एलेनार व फ्रँकलिन यांच्या विवाहात साधारणतः १९१८ नंतर ल्यूसी प्रेम प्रकरणामुळे जरी दरी निर्माण झाली होती तरी एलेनारचे फ्रँकलिनवर प्रेम होते यात वाद नाही. त्यामुळेच विवाहानंतर व मुले झाल्यानंतर १८२१ साली जेव्हा फ्रँकलिनला पोलिओ व्याधीची बाधा झाली व फ्रँकलिनचे पाय लुळे पडले तरीसुद्धा एलेनार यांनी आयुष्यभर फ्रँकलिन यांची मनापासून काळजी घेतलेली आढळते. पोलिओ झाल्यामुळे फ्रँकलिन यांना मानसिक आघात होऊ नये व ते पूर्वीसारखेच हसत-खेळत राहावेत यासाठी एलेनार आयुष्यभर प्रयत्न करत असत. एवढेच नव्हे तर, फ्रँकलिन यांना पोलिओ झाल्यानंतर त्यांनी राजकारणात पुन्हा सक्रिय व्हावे यासाठी देखील एलेनार यांनी मनापासून प्रयत्न केले होते. यामागचे कारण म्हणजे फ्रँकलिन यांना राजकारणात खूप रस होता व एलेनार यांना चांगले माहीत होते की फ्रँकलिन यांचे मन राजकारणात गुंतून राहिले तर ते आनंदीत व प्रफुल्लित राहतील व त्यांना त्यांच्या अपंगत्वाचा आपोआपच विसर पडेल. त्याचप्रमाणे त्यांना राजकारणाच्या माध्यमातून जनतेची सेवा केल्यामुळे मानसिक समाधान देखील लाभेल. फ्रँकलिन रुझवेल्ट यांच्या १९२४ साली राजकारणात झालेल्या पुनर्आगमनामध्ये एलेनार यांचा निश्चितच सिंहाचा वाटा होता. १९३२ ते १२ एप्रिल १९४५ एवढ्या फ्रँकलिन यांच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या प्रदीर्घ कालावधीत एलेनार यांनी अमेरिकेच्या राष्ट्रध्यक्षाची पत्नी म्हणजेच 'फर्स्ट लेडी' (First Lady) या नात्याने फ्रँकलिन यांना त्यांच्या कार्यात मोठी मदत केलेली निदर्शनास येते. एलेनार रुझवेल्ट या बऱ्याचदा देशाच्या विविध भागांचा दौरा करत असत व समाजातील विविध घटकांना भेटत असत. एलेनार यांच्या या दौऱ्यांमुळे फ्रँकलिन प्रशासनाला देशातील परिस्थिती तसेच विविध समस्यांचा 'आँखो देखा हाल' कळत असे व विविध नीती-धोरणे बनवण्यासाठी मदत होत असे.

एलेनार ही मुळातच खंबीर व्यक्तिमत्त्व असणारी स्त्री होती. अनेकजण तिचा उल्लेख खातं नसलेली मंत्री करीत असत. याचे कारण तिने फ्रँलिन रुझवेल्ट यांना विविध विषयांबाबतीत कळत-नकळत केलेले मार्गदर्शन व मदत होय. एलेनार आपल्या अपंग असलेल्या नवऱ्याचे व अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाचे कान, नाक व डोळे म्हणून काम करत असे हे विधान केल्यास अतिशयोक्ती ठरू नये. अनेकदा एलेनार अमेरिकेच्या विविध भागांना भेटी देऊन संपूर्ण देश पिंजून काढत असे व कोणत्या भागात काय चालू आहे व समाजातील कोणत्या गटाची कुठली मागणी आहे व ह्याची माहिती फ्रँकलिन प्रशासनापर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण काम करत असे. एलेनार 'व्हाईट हाऊस'मध्ये (White House - हे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचे निवासस्थान व कार्यालय होय. व्हाईट हाऊसला राष्ट्राध्यक्षीय प्रासाद देखील म्हटले जाते.) अनेक कार्यक्रमांचे आयोजन करीत असे व ह्या कार्यक्रमांची व्यवस्थीत आखणी करून व पाहुण्यांची चोख व्यवस्था करून ते सुरळीतपणे पार पडतील याची देखील दक्षता घेत असे. एलेनार स्वतः विविध पत्रांतून व नियतकालिकांतून लिखाण करत असे. तिला ह्यातून जे मानधन मिळत असे त्याचा वापर ती सामाजिक कार्यासाठी करत असे.

---

तुमचे जीवनावर प्रेम आहे ना? मग वेळ वाया दवडू नका;
कारण काळ म्हणजेच जीवन. - बेंजामिन फ्रँकलीन

त्यामुळेच एलेनारला एक आदर्श पत्नी, माता व 'फर्स्ट लेडी' म्हणणे वावगे ठरू नये. अमेरिकेत, अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या पत्नीला 'फर्स्ट लेडी' असे संबोधले जाते. एलेनारने 'फर्स्ट लेडी' ह्या पदाला खऱ्या अर्थाने एक वेगळे वलय व महत्त्व प्राप्त करून दिले यात वाद नाही. फ्रँकलिन जेव्हा पहिल्यांदा राष्ट्राध्यक्षाची निवडणूक लढविण्याचा विचार करत होते तेव्हा एलेनार थोडीशी नाराज होती असे म्हणतात. यामागचे कारण म्हणजे तिला असे वाटले होते की, फ्रँकलिन राष्ट्राध्यक्ष झाल्यावर तिला त्यांची पत्नी या नात्याने 'फर्स्ट लेडी' म्हणून त्यांच्यासोबत मिरवावे लागले व तिच्या विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांमध्ये खंड पडेल. परंतु लुई होव ह्या फ्रँकलिन यांच्या परममित्राने व त्यांच्या कारकीर्दीच्या उभारणीत सिंहाचा वाटा असलेल्या एका बुद्धीवान पत्रकाराने एलेनारशी याबाबतीत चर्चा केली व तिच्या मनातील शंकेचे निरसन केले. असे म्हणतात की, लुईने एलेनारला पटवून दिले की, ती 'फर्स्ट लेडी' म्हणून देशाची राजधानी वॉशिंग्टन डी. सी. येथे गेल्यावर ती तिच्या कामाला जास्त न्याय देऊ शकेल व ती तिचे कार्य राष्ट्रीय पातळीवर करू शकेल. लुई होवच्या ह्या सल्ल्यामुळे निश्चितच एलेनारचे मन वळविण्यास मदत झाली यात वाद नाही. लुई होव व त्याच्या एकंदरीत अवताराविषयी न्यू यॉर्क मधील सुरुवातीच्या काळात एलेनारच्या मनात थोडी नाराजी असे. परंतु जसजशी फ्रँकलिन व लुईची मैत्री घट्ट होत गेली व लुई वरचेवर रुझवेल्ट दांपत्याच्या घरी अनेकवेळा येऊ लागला तेव्हा एलेनारच्या लक्षात आले की, ही व्यक्ती अतिशय सज्जन व चांगली असून त्याच्या मनात नेहमी फ्रँकलिनचे भले कसे होईल व त्याची राजकीय कारकीर्द कशाप्रकारे पुढे नेता येईल हेच विचार घोळत असतात. तेव्हा तिला देखील लुईविषयी आस्था व जिव्हाळा वाटू लागला. पुढे चालून एलेनार व लुई ह्यांची अतिशय जीवलग मैत्री झाली. एवढेच नव्हे तर, लुई हा भावाप्रमाणे एलेनारला समजून घेत असे व अनेकवेळा एलेनार व फ्रँकलिन काही गोष्टींवरून एकमेकांपासून दूर चाललेत हे जेव्हा त्याच्या लक्षात येई तेव्हा तो एलेनारची समजूत काढीत असे. लुई फ्रँकलिनचा फक्त राजकीय बाबतीतच सल्लागार नव्हता तर तो रुझवेल्ट कुटुंबाचा एक सच्चा मित्र व आधारस्तंभ होता असे म्हणणे वावगे ठरू नये. त्यामुळेच १९३६ साली जेव्हा लुईचा मृत्यू झाला तेव्हा फ्रँकलिनला जेवढे दुःख झाले तेवढेच दुःख एलेनारला देखील झाले होते.

१९१० साली वयाच्या २९ व्या वर्षी फ्रँकलिन रुझवेल्ट न्यूयॉर्क राज्याच्या सीनेटचे सदस्य झाले होते. या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचा गड असणाऱ्या २६ व्या परगण्यात झालेल्या निवडणुकीत रिपब्लिकन उमेदवार स्कोसेर यांचा फ्रँकलिन यांनी पराभव केला होता. या निवडणुकीचा निकाल म्हणजे फ्रँकलिन रुझवेल्ट यांनी रिपब्लिकन पक्षाला त्यांच्याच बालेकिल्ल्यात दिलेला मोठा झटका होता. पुढे १९१२ साली झालेल्या न्यूयॉर्क राज्याच्या सीनेटच्या निवडणुकीतसुद्धा फ्रँकलिन रुझवेल्ट निवडून आले होते. फ्रँकलिन यांनी यावेळेला रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार जेकब साऊथर्ड यांचा पराभव केला होता. फ्रँकलिन यांच्या राजकीय कारकीर्दीची चर्चा एका व्यक्तिचे नाव घेतल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही आणि ही व्यक्ती म्हणजे 'लुई होव' ही होय. लुई होव हा पेशाने पत्रकार होता. परंतु त्याने आपले सर्व आयुष्य फ्रँकलिन यांना त्यांच्या राजकारणात सल्लागार व मदतनीस म्हणून मदत करण्यात वेचले.

१९१२ साली अमेरिकेत झालेल्या राष्ट्राध्यक्षीय निवडणुकीत फ्रँकलिन यांनी डेमॉक्रेटीक पक्षाचे उमेदवार वुड्रो विल्सन यांना पाठिंबा दिला होता. या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे फ्रँकलिन यांचे नातेवाईक व एलेनारचे काका थिओडर रुझवेल्ट हे रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार होते. या निवडणुकी दरम्यान फ्रँकलिन व एलेनार यांनी त्यांना वैयक्तिक नातेसंबंधांपेक्षा डेमॉक्रेटिक पक्षाच्या विचारसरणीशी जास्त बांधिलकी आहे असे सिद्ध केले

---

काय म्हणता? काळ निघून जातो? छे! छे! काळ तसाच असतो;
आपण मात्र निघून जातो! – ऑस्टीन डॉब्सन

होते. १९१२ च्या या राष्ट्राध्यक्षीय निवडणुकीत डेमॉक्रेटीक पक्षाचे वुड्रो विल्सन यांनी रिपब्लिकन पक्षाचे थिओडर रुझवेल्ट यांचा पराभव केला. १९१३ साली अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी फ्रँकलिन रुझवेल्ट यांची अमेरिकेच्या नौदल खात्याचे सहाय्यक मंत्री - असिस्टंट सेक्रेटरी (Assistant Secretary) म्हणून नियुक्ती केली होती. नौसेनेचे सहाय्यक मंत्री म्हणून फ्रँकलिन यांनी चांगली कामगिरी केलेली निदर्शनास येते. ते सहाय्यक मंत्री म्हणून या नात्याने नौदलातील अधिकाऱ्यांसोबत मित्रांप्रमाणे मिसळत असत व नौदलाच्या विविध समस्या सोडवण्यासाठी कार्यरत असत. त्यांच्या कार्यशैलीमुळे ते नौदलामध्ये लोकप्रिय होते.

१९२० साली झालेल्या राष्ट्राध्यक्षीय निवडणुकीत डेमॉक्रेटीक पक्षाने ओहायओ (Ohio) या राज्याचे तत्कालीन राज्यपाल- गव्हर्नर जेम्स कॉक्स (James Cox) यांना राष्ट्राध्यक्ष पदाची उमेदवारी दिली होती. या निवडणुकी दरम्यान फ्रँकलिन रुझवेल्ट डेमॉक्रेटीक पक्षाचे उपराष्ट्राध्यक्ष पदाचे उमेदवार होते. या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार वॉरेन हार्डींज (Warren Harding) व त्यांचे उपराष्ट्राध्यक्ष पदाचे उमेदवार कॅल्विन कूलीज (Calvin Coolidge) या जोडीने जेम्स कॉक्स व फ्रँकलिन रुझवेल्ट या जोडगोळीचा पराभव केला व हार्डींग्ज राष्ट्राध्यक्ष बनले तर कूलीज उपराष्ट्राध्यक्ष झाले. हार्डींग्ज यापूर्वी ओहायओ राज्यातून अमेरिकेच्या संसदेचे वरिष्ठ दालन असलेल्या सीनेटचे सदस्य म्हणून निवडून आले होते तर कूलीज हे मॅसॅच्युसेट्स (Massachusetts) या राज्याचे राज्यपाल - गव्हर्नर होते.

१९२८ साली न्यूयॉर्क राज्याच्या राज्यपाल पदासाठीच्या निवडणुकीत फ्रँकलिन रुझवेल्ट हे विजयी झाले व न्यूयॉर्क राज्याचे गव्हर्नर बनले. फ्रँकलिन यांनी या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार अल्बर्ट ऑटींगर (Albert Ottinger) यांचा पराभव केला होता. १९३० साली झालेल्या न्यूयॉर्क राज्याच्या राज्यपाल पदाच्या निवडणुकीतसुद्धा फ्रँकलिन रुझवेल्ट हे दुसऱ्यांदा निवडून आले होते. फ्रँकलिन रुझवेल्ट यांनी राजकारणात प्रवेश केल्यावर पूर्वेकडील न्यूयॉर्क या राज्याला डेमॉक्रेटीक पक्षाचा बालेकिल्ला बनवला होता असे म्हणणे वावगे ठरू नये.

१९३२ साली झालेल्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत फ्रँकलिन रुझवेल्ट यांनी रिपब्लिकन पक्षाचे हर्बर्ट हूवर (Hebert Hoover) यांचा पराभव केला व ते अमेरिकेचे ३२ वे राष्ट्राध्यक्ष झाले. यानंतर १९३६, १९४० व १९४४ साली झालेल्या राष्ट्राध्यक्षीय निवडणुकांमध्ये फ्रँकलिन रुझवेल्ट अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून लगातार निवडून आले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून सलग चार वेळा निवडून आलेले ते अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष होते. १९४० च्या निवडणुकीनंतर सारा यांना सलग तीन वेळा निवडून आलेल्या राष्ट्राध्यक्षाच्या आईचा मान मिळाला होता. सारा यांना त्यांच्या हयातीत आपला लेक तिसऱ्यांदा राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आला व त्याने अमेरिकेला आर्थिक महामंदीच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी भगिरथ परिश्रम घेतले, नव्हे अमेरिकेला आर्थिक महामंदीतून बाहेर काढले हे पाहण्याचे भाग्य लाभले.

फ्रँकलिन रुझवेल्ट यांच्या राष्ट्राध्यक्षीय कारकीर्दीचे विभाजन ढोबळमानाने दोन टप्प्यांत करता येईल. पहिला टप्पा म्हणजे ४ मार्च १९३३ ते ७ डिसेंबर १९४१ हा होय. या टप्प्यात रुझवेल्ट यांनी आपल्या 'न्यू डील' (New Deal) या कार्यक्रमाद्वारे अमेरिकेला आर्थिक महामंदीतून बाहेर काढण्यासाठी व अर्थव्यवस्थेला पूर्वरत रुळावर आणण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त केली. तर दुसरा टप्पा म्हणजे ७ डिसेंबर १९४१ ते १२ एप्रिल १९४५ हा होय. या टप्प्यांत त्यांनी अमेरिकेचे व एका अर्थाने मित्र राष्ट्रांचे दुसऱ्या महायुद्धात यशस्वीपणे नेतृत्व केले.

फ्रँकलिन यांचे वैशिष्ट्य म्हणजे ते आपल्या इतर पक्षातील राजकीय प्रतिस्पर्ध्यांसोबत वैरभावनेने वागत

नसत. त्यामुळेच फ्रँकलिन अध्यक्ष बनल्यानंतर त्यांनी रिपब्लिकन पक्षातील बुद्धिमान व जनतेसाठी कठोर परिश्रम घेणाऱ्या सदस्यांना आपल्या मंत्रीमंडळात स्थान दिलेले होते. फ्रँकलिन यांचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी समाजातील बुद्धिवंतांच्या, शिक्षण क्षेत्रातील लोकांच्या व प्रामुख्याने प्राध्यापक लोकांच्या बुद्धिकौशल्याचा वापर आपली नीती-धोरणे आखण्यासाठी व प्रशासन सुरळीतपणे चालविण्यासाठी मोठ्या खुबीने वापर करून घेतला होता. अशा व्यक्तींमध्ये ॲडॉल्फ ए. बर्ल (Adolf A. Berle), हॅरी. एल. होपकीन्स (Harry L. Hopkins), रेमन्ड मोले (Raymond Moley), सॅमुअल आय. रोझेमन (Samuel I. Roseman) व रेक्सफोर्ड जी. टग्वेल (Rexford G. Tugwell) यांचा समावेश होता. वृत्तपत्रे फ्रँकलिन यांच्या या मित्रमंडळींचा उल्लेख 'रुझवेल्ट्स् ब्रेन ट्रस्ट' (Roosevelt's Brain Trust) असा करत असत. फ्रँकलिन यांच्या मंत्रीमंडळाचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या मंत्रीमंडळात स्त्रियांना स्थान देण्यात आले होते. फ्रान्सिस पर्किन्स (Frances Parkins) यांना फ्रँकलिन रुझवेल्ट यांनी अमेरिकेच्या पहिल्या महिला मजूर मंत्री (Labour Secretary) होण्याचा मान दिला होता.

फ्रँकलिन यांनी आपल्या न्यू-डील या कार्यक्रमांतर्गत ॲग्रिकल्चरल ॲडजस्टमेन्ट ॲक्ट (Agricultural Adjustment Act. - AAA), टेनिसी व्हॅली ऑथॉरिटी ॲक्ट (Tennessee Valley Authority Act- TVA), नॅशनल इन्डस्ट्रियल रिकवरी ॲक्ट (National Industrial Recovery Act.), सिव्हिल वर्क्स ॲडमिनिसट्रेशन (Civil Works Administration -CAA), सिव्हिलियन कन्झर्व्हेशन कॉर्प्स (Civilian Conservation Corps - CCC), इत्यादी योजनांच्या मदतीने आर्थिक महामंदीच्या तडाख्यात अडकलेल्या अमेरिकन अर्थव्यवस्थेला व सामान्य जनतेला दिलासा देण्याचे मोठे काम केले. 'न्यू डील' आर्थिक कार्यक्रमांमुळे अमेरिकेतील बऱ्याच लोकांना रोजगार मिळाला यात वाद नाही.

फ्रँकलिन रुझवेल्ट यांच्या एकंदरीतच कारकीर्दीचे व प्रामुख्याने त्यांच्या 'न्यू डील' ह्या कार्यक्रमाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ह्या दोहोंमुळे अमेरिकेतील कृष्णवर्णीयांच्या नागरी हक्कासाठी चाललेल्या चळवळीचा प्रश्न राष्ट्रीय स्तरावर येण्यास मदत झाली. कृष्णवर्णियांच्या एक नेत्या व शिक्षणतज्ज्ञ असलेल्या मारी मॅक्लीयॉड बेथून (Mary McLeod Bethune) ह्यांनी जाहीरपणे सांगितले होते की, फ्रँकलीन रुझवेल्ट यांच्या प्रशासनापर्यंत आम्ही आमच्या मागण्या पोहोचवू शकतो व आमच्या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार होऊ शकेल अशी अपेक्षा देखील बाळगू शकतो. मारी बेथून ह्यांची एलेनारशी खूप चांगली मैत्री होती. किंबहुना एलेनारच्या अगदी जवळच्या मित्रमंडळींमध्ये अनेकजण कृष्णवर्णीय अमेरिकन होते. यात वॉल्टर फ्रान्सिस व्हाईट (Walter Francis White) यांचादेखील समावेश होता. व्हाईट हे कृष्णवर्णियांच्या नागरी हक्कांसाठीच्या चळवळीतले एक मोठे नेते होते. फ्रांसिस यांचे वैशिष्ट्य म्हणजे ते दिसण्यास गोऱ्या व्यक्तींसारखे होते. त्यांचे डोळे निळे होते व त्यांचे केस 'ब्लाँड' (Blond) म्हणजेच गोऱ्या युरोपियन वंशातील लोकांप्रमाणे पांढरट सोनेरी रंगाचे होते. त्यांचा वर्णदेखील गौर वा गोरा होता. परंतु त्यांच्या पूर्वजांपैकी काहीजण कृष्णवर्णीय होते. त्यामुळे ते स्वतःला कृष्णवर्णीयच समजत.

फ्रँकलिन रुझवेल्ट यांनी आपल्या प्रशासनात अनेक महत्त्वाच्या हुद्यांवर कृष्णवर्णीयांची नेमणूक केली होती. त्यांच्या ह्या कृष्णवर्णीय सहकाऱ्यांच्या गटाला 'ब्लॅक कॅबिनेट' (Black Cabinet) वा 'ब्लॅक ब्रेन ट्रस्ट' (Black Brain Trust) असे संबोधले जाई. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात कृष्णवर्णीय न्यायमूर्तींची नियुक्ती करणारे फ्रँकलिन रुझवेल्ट हे अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष होते. त्याचप्रमाणे थलसेनेत ब्रिगेडियर जनरल (Brigadier General) ह्या उच्च श्रेणीतील पदावर कृष्णवर्णीय व्यक्तीची नेमणूक करण्याचे धाडसदेखील फ्रँकलिन रुझवेल्ट यांनी दाखविले होते. त्याकाळात अमेरिकेत काही वर्णद्वेषी

गोऱ्या लोकांकडून कृष्णवर्णियांना भरपूर मारहाण करून त्यांची हत्या करण्याचे प्रकार सर्रास घडत असत. ह्या जमावाने स्वतः कायदा हातात घेऊन सामूहिकरित्या जीवंत माणसाला ठार करण्याच्या प्रकारास 'लिंचिंग' (Lynching) असे म्हटले जाई. फ्रँकलिन रुझवेल्ट यांनी ह्या अमानुष 'लिंचिंग'ला विरोध दर्शवून त्याचा निषेध केला होता. त्यांनी लिंचिंग म्हणजे अतिशय क्रूरपणे सामूहिकरित्या खून करण्याचा हीन प्रकार होय असे म्हटले होते. लिंचिंगचा असा जाहीर समाचार घेणारेसुद्धा फ्रँकलिन रुझवेल्ट हे पहिले राष्ट्राध्यक्ष होते. एकंदरीतच रुझवेल्ट यांच्या काळात सरकारसाठी काम करणाऱ्या कृष्णवर्णीय अभियंत्यांची, वास्तुविशारदांची, वकिलांची, ग्रंथपालांची, कार्यालयीन व्यवस्थापकांची तसेच इतर व्यावसायिकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली होती. काही अभ्यासकांच्या मते ह्या संख्येत रुझवेल्ट प्रशासनाच्या काळात तिप्पट वाढ झालेली होती. कृष्णवर्णियांच्या लढ्यात एलेनार रुझवेल्ट यांचा कृष्णवर्णीय नेत्यांना व कार्यकर्त्यांना कायमच पाठिंबा राहिलेला होता. त्यामुळे अमेरिकेतील कृष्णवर्णियांच्या इतिहासाचे अभ्यासक व त्यांच्या नागरी हक्कांच्या चळवळीत सक्रीय भाग घेतलेले अनेक कार्यकर्ते आजही आवर्जून मान्य करतात की, फ्रँकलिन व एलेनार रुझवेल्ट यांनी कृष्णवर्णियांचा प्रश्न पहिल्यांदा खऱ्या अर्थाने राष्ट्रीय स्तरावर आणून कृष्णवर्णियांना मनापासून मदत करण्याचा सच्चा प्रयत्न केला होता.

'न्यू डील' प्रणीत अनेक कार्यक्रमांमध्ये कृष्णवर्णियांना सामावून घेण्याचे व त्यांना त्याचे फायदे मिळावेत यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केलेले आपल्या लक्षात येते. उदाहरणच द्यायचे झाले तर १९३५ पर्यंत 'वर्क्स प्रोग्रेस ॲडमिनिस्ट्रेशन' (Works Progress Administration) ह्या योजनेअंतर्गत जवळ जवळ ३५००० कृष्णवर्णियांना रोजगार मिळाला होता. हे प्रमाण एकूण काम मिळालेल्या व्यक्तींच्या १५% एवढे होते. सिव्हिलियन कॉन्व्हर्शेशन कॉर्प्स (Civilian Conservation Corps) ह्या योजनेअंतर्गत १९४२ पर्यंत ३५०,००० कृष्णवर्णियांना रोजगार देण्यात रुझवेल्ट प्रशासनाला यश आले होते. नॅशनल युथ ॲडमिनिस्ट्रेशन (National Youth Administration) ह्या योजनेअंतर्गत जवळ जवळ ३००,००० कृष्णवर्णीय युवकांना दिलासा देण्यात आला होता. पब्लिक वर्क्स ॲडमिनिस्ट्रेशन (Public Works Administration) ह्या योजनेत १९३४ मध्ये एक नवीन कलम घालून १९३० च्या जनगणनेच्या आधारे किती प्रमाणात कृष्णवर्णियांना काम देण्यात यावे याचे प्रमाण वा कोटा (Quota) ठरविण्यात आला होता. फेडरल म्युझिक प्रोजेक्ट (Federal Music Project) व फेडरल थिएटर व रायटिंग प्रोजेक्टस् (Federal Theatre Writing Projects) ह्या कार्यक्रमांतर्गत अनुक्रमे कृष्णवर्णीय गायक व संगीत कलाकारांना व लेखक साहित्यिकांना कटाक्षाने विविध स्वरूपात मदत देण्याचा प्रयत्न झाला होता.

फ्रँकलिन यांच्या परराष्ट्र धोरणाचा अभ्यास केला असता असे लक्षात येते की, त्यांनी दक्षिण अमेरिकेतील शेजारील राष्ट्रांशी अमेरिकेचे सलोख्याचे संबंध प्रस्थापित करण्याचे प्रयत्न केले. फ्रँकलिन यांनी आपल्या प्रशासनाच्या दक्षिण अमेरिकेतील राष्ट्रांसोबतच्या परराष्ट्र धोरणास 'गूड नेबर पॉलिसी' (Good Neibhour Policy) असे संबोधले. जुलै १९३४ साली दक्षिण अमेरिकेतील राष्ट्रांना भेट देणारे ते अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष ठरले. त्यांच्या काळात सोविएट संघासोबत (रशियन) संबंध सुधारण्यासाठी देखील प्रामाणिक प्रयत्न झालेले आढळतात. फ्रँकलिन यांच्या प्रशासनाने नोव्हेंबर १९३३ साली रशियातील साम्यवादी सरकारला मान्यता देखील दिली होती.

१९३९ साली जेव्हा दुसरे महायुद्ध सुरू झाले तेव्हापासूनच अमेरिका व फ्रँकलिन रुझवेल्ट यांची सहानुभूती इंग्लंड व फ्रान्स सारख्या मित्रराष्ट्रांना होती. याचे कारण फ्रँकलिन यांना जर्मनी, इटली व जपानमधील तत्कालीन हुकूमशाही राजवटीपासून जागतिक शांततेला

जे लपलेले आहे ते सारे काळ उजेडात आणेल; आणि जे आज वैभवाने चमकत आहे
ते तो आच्छादून टाकेल. – होरेस

व लोकशाहीला असलेला धोका चांगलाच ठाऊक होता. दुसऱ्या महायुद्धानंतर जगामध्ये शांतता नांदावी असे फ्रँकलिन रुझवेल्ट यांना मनापासून वाटत असे. त्यामुळेच ऑगस्ट १९४१ मध्ये फ्रँकलिन रुझवेल्ट यांनी इंग्लंडचे तत्कालिन पंतप्रधान विस्टन चर्चिल (Winston Churchill) यांची भेट घेतली होती. या भेटीचे फलीत म्हणजे रुझवेल्ट व चर्चिल यांनी जाहीर केलेला जगप्रसिद्ध असा 'अटलांटीक चार्टर' (Atlantic Charter) हा जाहीरनामा होय. या जाहीरनाम्यातील सर्वात महत्त्वाचे कलम म्हणजे जगातील प्रत्येक राष्ट्राला आपल्या देशात कोणत्या प्रकारचे सरकार असावे हे ठरविण्याचा अधिकार असावा हे होय. अभ्यासकांचे असे मत आहे की, भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळण्यामध्ये हा अटलांटीक चार्टर व एकंदरीतच फ्रँकलिन रुझवेल्ट यांनी चर्चिल यांच्यावर टाकलेला दबाव याचा फार मोठा वाटा होता. त्यामुळेच प्रस्तुत लेखकाने विद्या प्रसारक मंडळ, ठाणे संचलित जोशी-बेडेकर महाविद्यालयातर्फे प्रकाशित होण्याऱ्या 'युवाशिल्प' या मासिकात अमेरिका व भारत यांच्यातील ऐतिहासिक संबंधांचा मागोवा घेणारा इंग्रजीतील एक लेख फार वर्षांपूर्वी लिहिला होता. सदर लेखात लेखकाने अमेरिका व भारत यांचा उल्लेख 'कलोनियल कझिन्स' (Colonial Cousins) असा केला होता. हा शब्दप्रयोग करण्यामागचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे अमेरिका व भारत हे दोन्ही देश एकेकाळी इंग्लंड या देशाच्या वसाहती होत्या. असो. ७ डिसेंबर १९४१ रोजी जर्मनी व इटलीचा मित्र जपान या देशाने अमेरिकेच्या प्रशांत महासागरातील हवाई बेटांतील पर्ल हार्बर येथील नौसेनेच्या तळावर हल्ला करून ते नेस्तनाभूत केले. त्यामुळे ८ डिसेंबर १९४१ रोजी अमेरिकेने जपानविरुद्ध युद्ध जाहीर केले. या घटनेनंतर जर्मनी व इटलीने अमेरिकेविरुद्ध युद्ध जाहीर केले व इंग्लंड व फ्रान्सने अमेरिकेला पाठिंबा जाहीर केला. त्यामुळे अमेरिकेचा दुसऱ्या महायुद्धात रितसर प्रवेश झाला. इतिहासकारांचे असे म्हणणे आहे की, प्रामुख्याने अमेरिकेमुळेच मित्र राष्ट्रांना दुसऱ्या महायुद्धात विजय प्राप्त करणे शक्य झाले. दुसऱ्या महायुद्धात फ्रँकलिन रुझवेल्ट यांनी इंग्लंडचे पंतप्रधान चर्चिल व रशियाचे पंतप्रधान जोसेफ स्टॅलिन यांच्या सोबत यॉल्टा (Yalta), तेहरान (Tehran) इत्यादी ठिकाणी झालेल्या परिषदांमध्ये सहभाग घेतलेला होता. दुसऱ्या महायुद्धा दरम्यान जेव्हा फ्रँकलिन रुझवेल्ट, विन्स्टन चर्चिल व स्टॅलिन यांच्या ह्या बैठकी व परिषदा होत असत तेव्हा फ्रँकलिन यांच्या लक्षात आले की, स्टॅलिन थोडा अलिप्त राहत असून तो फ्रँकलिन व चर्चिल यांच्यासोबत दिलखुलासपणे बोलत नाही. त्यावेळी फ्रँकलिन अनेकदा स्टॅलिन यांना विनोद सांगून हसवत असत व त्यामुळे हळूहळू स्टॅलिनच्या वागण्या बोलण्यात मोकळेपणा आला असे अभ्यासक म्हणतात. अभ्यासक असे देखील म्हणतात की, फ्रँकलिन यांच्या प्रयत्नांमुळेच दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक शांतता राखण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघटनेची - युनो (United Nations Organisation - UNO) या जागतिक स्तरावरील आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना होऊ शकली.

फ्रँकलिन यांच्या प्रशासन काळातच अमेरिकेने दक्षिणेकडील न्यू मेक्सिको (New Mexico) या राज्यांतील लॉस अल्मॉस (Los Alamos) या ठिकाणी १९४३ साली अणुबाँब बनवण्याच्या कार्यक्रमाची सुरुवात झाली. या अणुबाँब बनवण्याच्या प्रक्रियेचे नेतृत्व अमेरिकेतील जगप्रसिद्ध भौतिक शास्त्रज्ञ जे. रॉबर्ट ओपेनहायमर (J. Robert. Oppenheimer) यांच्याकडे होते. असे म्हटले जाते की, २० व्या शतकातील सर्वश्रेष्ठ मानले गेलेले शास्त्रज्ञ अल्बर्ट आइनस्टाइन (Albert Einstein) यांनी फ्रँकलिन रुझवेल्ट यांना लिहिलेल्या एका पत्रामुळे रुझवेल्ट यांनी अमेरिकेतर्फे अणुबाँब बनवण्याच्या कार्यक्रमाला मंजूरी दिली.

आइनस्टाइन यांनी हे प्रसिद्ध पत्र २ ऑगस्ट १९३९ रोजी लिहिले होते. श्रीमती ज्योत्स्ना लेले लिखित 'फ्रँकलिन-रुझवेल्ट अमेरिकेचा तारणहार ठरलेल्या जिद्दी

नेत्याची यशोगाथा' या पुस्तकात पृष्ठ क्रमांक २३०-२३१ वर या पत्राचे मराठीतील भाषांतर दिलेले आहे. सदर भाषांतर वाचकांसाठी खाली उद्‌धृत करत आहोत,

ॲटमबॉम्बची पूर्वतयारी आइन्स्टाइनचे पत्र
ऑगस्ट २, १९३९

प्रति,
एफ. डी. रुझवेल्ट
युनायटेड स्टेट्‌सचे राष्ट्राध्यक्ष व्हाइट हाऊस
वॉशिंग्टन डी.सी.

सर,

इ. फर्मी व एल. स्झिलार्ड यांनी मला पाठवलेल्या एका हस्तलिखितावरून व त्यांच्या अलीकडील संशोधनाबद्दल दिलेल्या माहितीनुसार, पुढील अनुमान करण्यास मला उद्युक्त केले आहे. नजिकच्या भविष्यकाळात 'युरेनियम' हे मूलतत्त्व हा एक नवा व महत्त्वाचा शक्तिस्रोत ठरू शकेल.

या सर्व घडामोडींमुळे उत्पन्न झालेल्या काही बाबतींत सावधानता बाळगण्याची गरज निर्माण झाली आहे आणि जरूर पडली तर अमेरिकन प्रशासनाने जलद कृती करण्याची निकड निर्माण झाली आहे. खालील निर्देशित सत्य घटनांकडे व त्यावरील शिफारशींकडे आपले लक्ष वेधणे मी माझे कर्तव्य समजतो.

गेल्या चार महिन्यांच्या काळात, फ्रान्समध्ये जेलिएट आणि अमेरिकेत फर्मी व स्झिलार्ड करत असलेल्या संशोधनामुळे अशी शक्यता निर्माण झाली आहे की, युरेनियमच्या मोठ्या वस्तुमानातून आण्विक विघटनांच्या संक्रमणाच्या साहाय्याने प्रचंड शक्ती व 'रेडियम'सारख्या मूलतत्त्वाचा फार मोठा साठा बाहेर पडेल.

आता अगदी नजिकच्या काळात हे साध्य होण्याची फार मोठी शक्यता निर्माण झाली आहे.

या नव्या अद्‌भुत संकल्पनांमुळे बॉम्बची जुळणी शक्य होईल आणि अजून अगदी खात्रीलायक नसले, तरी नव्या प्रकारचे अत्यंत शक्तिशाली बॉम्ब बनवता येतील. या प्रकारचा एखादा बॉम्ब जर बोटीने वाहून नेला व फोडला, तर त्या संपूर्ण बंदराचा व त्या सभोवतालच्या प्रदेशाचा विध्वंस होऊ शकेल. परंतु विमानातून वाहून नेण्यासाठी मात्र हे बॉम्ब खूप जड ठरतील.

अमेरिकेकडे फार निकृष्ट दर्जाचा युरेनियम असून तो अगदी माफक प्रमाणात उपलब्ध आहे. कॅनडा व आधीचा झेकोस्लोव्हाकिया या देशांकडे चांगल्या दर्जाचा युरेनियमचा साठा आहे आणि बेल्जियम कांगो हा देश युरेनियम मिळवण्याचा मोठा स्रोत आहे.

या परिस्थितीचा विचार करता या रायायनिक प्रक्रियांच्या संशोधनावर काम करणारे अमेरिकेतील शास्त्रज्ञ व अमेरिकन शासन यांच्यामध्ये कायमस्वरूपी संबंध प्रस्थापित होणे स्वागतार्ह आहे असे आपणास जाणवेल. हे साध्य करण्याचा एक मार्ग म्हणजे तुमच्या विश्वासातील एखाद्या व्यक्तीकडे ही जबाबदारी सोपवणे. ती व्यक्ती कदाचित हे काम अनौपचारिकरित्याही पार पाडू शकेल. त्याच्या कामामध्ये खालील गोष्टींचा अंतर्भाव असावा-

अ) सरकारी खात्यांशी संपर्क प्रस्थापित करणे, त्यांना पुढील प्रगतीबद्दल माहिती उपलब्ध करून देणे व शासकीय कृतीसाठी शिफारशी प्रस्तुत करणे. युरेनियमचा साठा उपलब्ध होण्याच्या प्रश्नावर, अमेरिकेचे विशेष निर्बंध घालण्यावर लक्ष देणे.

ब) अमेरिकन विद्यापीठे सध्या त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या तुटपुंज्या निधीतून या संशोधनासाठी अर्थसाहाय्य करीत आहेत.या संशोधनासाठी आवश्यकता भासल्यास, ज्या खाजगी व्यक्ती यासाठी अर्थसाहाय्य करू इच्छितात त्यांच्याशी संपर्क साधून निधी उपलब्ध करून देता येईल आणि ज्यांच्याकडे ती उपकरणे उपलब्ध असतात, अशा औद्योगिक प्रयोगशाळांचीही मदत घ्यावी.

जर्मनीने झेकोस्लोव्हाकियाच्या खाणींवर ताबा मिळवल्यावर तेथील युरेनियमच्या विक्रीवर त्यांच्या सरकारने संपूर्ण बंदी घातली असल्याचे मला समजले आहे.

जर्मनीच्या सरकारने ही कारवाई इतक्या तातडीने केल्याचे कदाचित हे कारण संभवते की, त्यांचा अंडर सेक्रेटरी ऑफ स्टेट व्हॉन वैइसॅकर याच्या मुलाची बर्लिनमधील 'कैंसर विल्हेम इन्स्टिट्यूट' वर (जिथे अमेरिकेत होत असलेल्या युरेनियमच्या संशोधनावरील कामाची पुनरावृत्ती होत आहे) नेमणूक झाली आहे.

हिटलरसारख्या नराधमाचा पाडाव करण्यासाठी अणुबाँबसारखा महाविनाशक बाँब बनविण्यात आला. परंतु ह्याच बाँबमुळे भविष्यात जपानमधील हजारो निष्पाप नागरिकांचा बळी जाईल असे हा अणुबाँब बनविताना कुणालाच वाटले नसेल! सध्या तर उत्तर कोरीयातील बेजबाबदार राज्यकर्ते अण्वस्त्र म्हणजे लहान मुलांच्या हातातील खेळणे असावे असे वागताना व वल्गना करताना दिसत आहेत. भविष्यात कधीही ह्या भयंकर अण्वस्त्रांचा वापर न करण्याची सद्बुद्धी ईश्वराने मानवाला द्यावी अशी प्रार्थना करावीशी वाटते. असो.

१२ एप्रिल १९४५ रोजी आपल्या वॉर्म स्प्रिंग्ज् येथील निवासस्थानी जेफर्सन यांच्या वाढदिवसानिमित्त करावयाच्या भाषणाची तयारी करत असताना दुपारी ३ वाजून ३५ मिनिटांनी अमेरिकेच्या या महान सुपुत्राचे व नेत्याचे मेंदूत झालेल्या रक्तस्रावामुळे निधन झाले. इतिहातील या महान व्यक्तीचे नाव दुसऱ्या महायुद्धामध्ये प्राण गमावणाऱ्या सैनिकांच्या यादीत समाविष्ट करण्यात आले. फ्रँकलिन रुझवेल्ट यांच्या मृत्यूमुळे संपूर्ण अमेरिका व जगातील अनेक देशांमध्ये शोककळा पसरली. यात आपल्या भारत देशाचा देखील समावेश होता. कारण भारताच्या पं. जवाहरलाल नेहरू यांच्यासारख्या नेत्याने फ्रँकलिन रुझवेल्ट यांना पत्र लिहिल्याचे दाखले आढळतात. फ्रँकलिन यांची शवपेटिका वॉर्म स्प्रिंग्जहून वॉशिंग्टन डीसी येथे एका विशेष गाडीने १४ एप्रिल १९४५ रोजी आणण्यात आली. या गाडीतील शवपेटीचे दर्शन घेण्यासाठी हजारो लोक ही शवपेटिका वाहून नेणाऱ्या आगगाडीच्या लोहमार्गांच्या दोन्ही बाजूला उभे राहिलेले असल्याची दृश्ये आढळतात. फ्रँकलिन रुझवेल्ट यांच्या न्यूयॉर्कमधील हाईडपार्क येथील घराच्या बगिच्यामध्ये त्यांच्या मृतदेहाचे दफन करण्यात आले. फ्रँकलिन रुझवेल्ट यांचा दफनविधी झाल्यानंतर एलेनार रुझवेल्ट यांच्या मनःस्थितीचे हृदयद्रावक वर्णन श्रीमती ज्योत्स्ना लेले यांनी आपल्या 'फ्रँकलिन रुझवेल्ट – अमेरिकेच्या तारणहार ठरलेल्या जिद्दी नेत्याची यशोगाथा' ह्या पुस्तकात पृष्ठ क्रमांक २५३–५४ वर केले आहे. श्रीमती ज्योत्स्ना लेले यांच्या पुस्तकातील हा मजकूर वाचकांसाठी खाली उद्धृत करीत आहोत.

''दफनविधी समारंभानंतर सर्वजण निघून गेले. एलेनार बऱ्याच वेळेपर्यंत तिथे स्तब्ध उभी होती. तिने आपल्या पोशाखावर फ्रँकलिनने लग्नामध्ये भेट दिलेली रत्नजडित पिन लावली होती. वरून शांत, गंभीर दिसत असली तरी ४२ वर्षांच्या वैवाहिक जीवनानंतर जोडीदार पुढे निघून गेल्यामुळे तिच्या आयुष्यात एक कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली होती. ती आपल्या दुःखाला एका जुन्या कवितेत शोधत होती. 'त्या' च्या आठवणी हाच दुःखावरचा उतारा होता.

''जेव्हा दोघांपैकी एकजण जाईल निघून पुढे,<br>
मागे उरेल दुसरा धुरा वाहण्यासाठी....<br>
त्यानंतर राहतील फक्त आठवणी.<br>
त्याच तरून नेतील दुःखाच्या समुद्रातून<br>
आठवणी तुझ्या –माझ्या एकत्रित दिवसांच्या,<br>
माझ्या व तुझ्या जगाबद्दलच्या कर्तव्यांच्या.''

वाचकांना येथे सांगावेसे वाटते की, फ्रँकलिन व एलेनार रुझवेल्ट यांच्या जीवनावर आधारित एलेनार अँड फ्रँकलिन (Eleanor and Franklin), एलेनार अँड फ्रँकलिन : व्हाईट हाऊस (Eleanor Franklin : White House) या दूरदर्शन मालिका व एलेनार यांच्या जीवनावर

'द एलेनार रुझवेल्ट स्टोरी' (The Eleanor Roosevelt Story) तर फ्रँकलिन रुझवेल्ट यांच्या जीवनावर आधारित तर फ्रँकलिन स्टोरी (Franklin story) या डॉक्यूमेंट्री फ्रिल्म्स्, सनराईज ॲट कॅम्पोबेला (Sunrise at Campobello) सारखा चरित्रात्मक चित्रपट बनलेला आहे. या व्यतिरिक्त या जोडप्याच्या जीवनावर आधारित इतरही डॉक्यूमेंटरी बनलेल्या आहेत.

अमेरिकेचा राजकीय इतिहास फ्रँकलिन डिलानो रुझवेल्ट व एलेनार रुझवेल्ट यांचा उल्लेख केल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. फ्रँकलिन यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून व एलेनार रुझवेल्ट यांनी 'फर्स्ट लेडी' या नात्याने केलेले कार्य खरोखरच अतुलनीय आहे. फ्रँकलिन हे चारवेळा निवडून येणारे अमेरिकेच्या इतिहासातील पहिले व शेवटचे राष्ट्राध्यक्ष ठरले. त्यांनी आपल्या बारा ते तेरा वर्षांच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या कारकीर्दीत अभूतपूर्व कार्य केले होते यात वाद नाही. अमेरिकेच्या फ्रँकलिन डिलानो रुझवेल्ट नामक महान सुपुत्राला व जगाच्या इतिहासातील उदारमतवादी व दूरदृष्टी असलेल्या नेत्याला मानाचा मुजरा व सलाम!

**संदर्भ :**


- फ्रँकलीन रुझवेक्ट : अमेरिकेचा तारणहार ठरलेल्या जिद्दी नेत्याची यशोगाथा – ज्योत्स्ना विद्याधर लेले
- वर्ल्डबुक एनसायक्लोपेडीया



**– सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी–बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com


•••

(पृष्ठ क्र. ८ वरून - **स्वदेशवेध–०५ अक्षरधाम मंदिर, नवी दिल्ली**)

त्यांचे हावभावही ते जिवंत भासावेत असेच आहेत. दुसऱ्या प्रदर्शनात स्वामिनारायणांची जीवनगाथा ८५ x ६५ फूट आकाराच्या भव्य (आय मॅक्स) पडद्यावर एका अद्‌भुत चित्रपटाद्वारे दर्शवण्यात येते. स्वामिनारायणांचे पात्र साकारणारे बाल कलाकार संस्मरणीय आहेत. चित्रपटाचा दर्जा अप्रतिम आहे. तिसरे प्रदर्शन एका वातानुकुलीत भव्य दालनांतर्गत निर्माण केलेल्या छतावृत्त नदीमधील १५ मिनिटांच्या नौकाविहारात, त्या नदीच्या दुतर्फा संजीवित करण्यात आलेल्या भारतीय संस्कृतीच्या देखाव्यांद्वारे प्रबोधन करते. इथे तक्षशीला विद्यापीठ, सुश्रुताचे शुश्रुषालय, नागार्जुनाची रसशाळा इत्यादी सांस्कृतिक स्थळे पुनर्जीवित केलेली आहेत.



**सहजानंद रंग–संगीतावर थिरकणारे भव्य कारंजे**

याव्यतिरिक्त ३०० x ३०० फुटाची भव्य पुष्करणी, हृदयकमल, परिक्रमा, यज्ञकुंड इत्यादी यथासांग माहिती वरील संकेतस्थळांवर उपलब्ध आहेच. केवळ उत्सुकता जागृत व्हावी, माहिती व्हावी आणि आज मितीस भारतात, इतरांस अभिमानाने दाखवता यावे असे एक भव्य मंदिर इथे आहे, हे कळावे ह्यासाठीच हे सव्यापसव्य. आपल्याला ही माहिती आवडेल ही अपेक्षा आहे.


**– नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

# महाराष्ट्रातील महान लेखक व पत्रकार अरुण साधू यांना भावपूर्ण श्रद्धांजली !

२५ सप्टेंबर २०१७ रोजी महाराष्ट्रातील प्रसिद्ध लेखक व पत्रकार श्री. अरुण साधू यांचे निधन झाले. वर्तमानपत्रात त्यांच्या निधनाची बातमी वाचल्यावर फार वाईट वाटले. अरुण साधू हे अतिशय व्यासंगी विचारवंत व आपल्या लिखाणातून वाचकाच्या मनात वैचारिक वादळ निर्माण करण्याची क्षमता असणारे लेखक होते. आपल्या लिखाणाच्या माध्यमातून त्यांनी गेली अनेक वर्षे मराठी वाचकाला मोठी मेजवानी दिलेली होती. त्यांचे मराठी व इंग्रजी ह्या दोन्ही भाषेंवर तेवढेच प्रभूत्व होते.

अरुण साधूंचा जन्म अमरावती जिल्ह्यातील आचलपूर येथे १९४१ साली झाला होता. साधू यांनी पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन व पत्रकारिता विभागात अध्यापनाचे काम देखील केलेले होते. १९६० च्या दशकात त्यांनी पुण्यातून प्रसिद्ध होणाऱ्या 'केसरी' ह्या वृत्तपत्रातून आपल्या पत्रकारितेची सुरुवात केली होती. साधू यांनी तीन दशकांहून जास्त काळ पत्रकार म्हणून काम केलेले होते व ह्या काळात त्यांनी 'द स्टेटस्मन', 'द टाईम्स ऑफ इंडिया', 'द इंडियन एक्सप्रेस', 'फ्री प्रेस जर्नल' आदी वृत्तपत्रांमध्ये सेवा केली होती.

पत्रकारासोबतच त्यांच्यामध्ये एक लेखक दडलेला होता. अरुण साधू यांनी मराठीमध्ये एकाहून एक सरस व दर्जेदार अशा साहित्यकृती निर्माण करून ठेवलेल्या आहेत. त्यांच्या काही प्रसिद्ध ग्रंथांची नावे पुढीलप्रमाणे आहेत - 'ड्रॅगन जागा झाल्यावर', 'मुखवटा, सिंहासने, 'मुंबई दिनांक, 'शोधयात्रा', 'पडघम', 'स्फोट', 'बहिष्कृत', 'त्रिशंकू', 'ग्लानिर्भवती भारत'. त्यांनी कादंबरी, नाटक, लघुकथा, वैचारिक गद्य इत्यादी साहित्य प्रकार अतिशय कुशलपणे व सहजतेने हाताळलेले दिसतात.

अरुण साधूंच्या 'सिंहासन' व 'मुंबई दिनांक' ह्या कादंबऱ्यांवर आधारीत 'सिंहासन' हा मराठीतील अतिशय गाजलेला चित्रपट बनविण्यात आला आहे. 'सिंहासन' हा चित्रपट महाराष्ट्रातील त्यावेळच्या राजकारणावर बेतलेला असून महाराष्ट्रातील तत्कालीन राजकीय चित्र अतिशय सुरेखपणे ह्या चित्रपटाद्वारे चंदेरी पडद्यावर दाखविलेले आहे. ह्या चित्रपटाचे दिग्दर्शन मराठीतील सुप्रसिद्ध दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी केलेले असून अरुण सरनाईक, डॉ. श्रीराम लागू, डॉ. मोहन आगाशे, मधुकर तोरडमल, दत्ता भट, लिलाधर कांबळी, श्रीकांत मोघे, रीमा लागू इत्यादी प्रसिद्ध कलाकारांनी ह्या चित्रपटात विविध भूमिका साकारल्या आहेत. सिंहासन कादंबरी व त्यावर आधारीत चित्रपट ह्या दोन्ही कलाकृती अजरामर आहेत.

अरुण साधूंना समाजाच्या तळागाळातील व्यक्तींविषयी आस्था होती. यातूनच त्यांनी अस्पृश्यतेच्या समस्येवर आधारीत 'बहिष्कृत' ही कादंबरी लिहिली होती. अरुण साधूंना त्यांनी साहित्याच्या क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल साहित्य अकादमी पुरस्कार, भारतीय भाषा परिषद पुरस्कार, आचार्य अत्रे पुरस्कार आदी पुरस्कार देखील मिळालेले होते. २००७ साली नागपूर येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. २००८ साली सांगली येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे मावळते अध्यक्ष म्हणून त्यांनी संमेलनात साहित्यिकांपेक्षा राजकारण्यांचा हस्तक्षेप जास्त आहे असा निषेध नोंदवून ते स्वागत समारंभातून निघून गेले होते. यातून त्यांचा स्वाभिमान व त्यांच्यातील सच्च्या साहित्यिकाचे सगळ्या जगाला दर्शन घडले होते.

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे संचलीत ठाण्यातील के. ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालयात ते दोनवेळा येऊन गेले होते. पहिल्यांदा ते २००९ साली 'स्वातंत्र्योत्तर भारतीय साहित्य' (Post Independence Indian Literature) ह्या राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटक म्हणून आले होते; तर दुसऱ्यांदा ९ सप्टेंबर २०१५ रोजी महाविद्यालयाच्या मराठी भाषा मंडळातर्फे आयोजित 'लेखक आपल्या भेटीला' या कार्यक्रमासाठी आले होते. ते जेव्हा दुसऱ्यांदा महाविद्यालयात आले तेव्हा मी व प्रा. अनिल भाबड यांनी अरुण साधूंची मुलाखत घेतली होती. मुलाखती दरम्यान विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी दिलखुलास उत्तरे दिली होती. मुलाखत देताना त्यांनी काही प्रश्नांना मार्मिक व विनोदी उत्तरे देऊन प्रेक्षकांमध्ये खसखसदेखील पिकवली होती. अरुण साधू यांच्या स्मृती जोशी-बेडेकर महाविद्यालय व विद्या प्रसारक मंडळाच्या कायमच स्मरणात राहतील. डॉ. विजय बेडेकर, कार्याध्यक्ष, विद्या प्रसारक मंडळ, ठाणे व विद्या प्रसारक मंडळ संचलित सर्व शैक्षणिक संस्थांतर्फे मराठी साहित्यातील अरुण साधू नामक चमकत्या ताऱ्याला भावपूर्ण श्रद्धांजली व ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो ही प्रार्थना.

**- सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.

---

काळ ही एक वाहती नदी आहे; जे तिच्या प्रवाहाबरोबर प्रतिकार न करता
वाहात जातात ते सुखी. – ख्रिस्तोफर मोर्ली

# परिसर वार्ता

**– संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

- दि. १३/९/२०१७ रोजी कला विषय एक दिवसीय उद्बोधन वर्ग (कृतीसत्र) मराठी ग्रंथ संग्रहालयाचे सभागृह, ठाणे येथे आयोजित करण्यात आले होते. या कृतीसत्रास मा. भास्कर तिखे, कला निरिक्षक महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच मा. प्रा. सुहास बहुलकर (प्रसिद्ध चित्रकार) सर ज. जी. कला महाविद्यालय, मुंबई मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. तसेच ठाणे जिल्हा शैक्षणिक कलाध्यापक संघाचे उपाध्यक्ष व आपल्या शाळेचे कलाशिक्षक वासुदेव वैद्य उपस्थित होते.
- दि. १४ सप्टेंबर २०१७ रोजी इ. १० वीच्या विद्यार्थ्यांनी इ. ५ वी व इ. ९ वीच्या विद्यार्थ्यांचे पाठ घेऊन वेगळ्या पद्धतीने 'शिक्षक दिन' साजरा केला.
- भारत विकास परिषद, वसंत विहार शाखेतर्फे १६ सप्टेंबर २०१७ रोजी डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे पार पडलेल्या हिंदी व संस्कृत समूहगीत स्पर्धेत आपल्या शाळेतील ८ वीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. तसेच याचवेळी घेण्यात आलेल्या प्रश्नमंजूषा स्पर्धेतही विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.
- ठाणे महानगरपालिका व जिल्हा अधिकारी ठाणे यांच्या सौजन्याने ठाणे तालुका कब्बड्डी असोसिएशन आयोजित आंतरशालेय पावसाळी कब्बड्डी स्पर्धा २०१७-१८ मध्ये आपल्या शाळेच्या १४ वर्षांखालील मुलांच्या संघाने अंतिम विजय प्राप्त केला.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**CASTIC – China Adolescent Science and Technology Innovation Contest चा निकाल**

मागच्या वर्षीप्रमाणे यावर्षी देखील आमच्या शाळेतील ४ विद्यार्थ्यांनी ३२ व्या China Adolescent Science and Technology Innovation Contest (CASTIC), हंगझो, चीन येथे भाग घेतला. मिहीर गोरे आणि रुचिर चित्रे यांनी 'Low Cost Security System for Jewellry Shops!' हा प्रकल्प सादर केला. तसेच यश कोकणे आणि ध्रूव देवरे यांनी 'Parking Sensor (Autonomous Car Parking System)' हा प्रकल्प सादर केला. दोन्ही प्रकल्पांना दुसरे पारितोषिक मिळाले व विद्यार्थ्यांना रौप्य पदके आणि प्रशिस्तीपत्रके मिळाली.

आमच्या शाळेने भाग घेण्याचे हे ११वे वर्ष व पारितोषिक मिळवण्याचे १०वे वर्ष आहे.

**बृहन्मुंबई अध्यापक मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या Maths Concept Exam चा निकाल :** संक्षिप्त :

| इयत्ता | श्रेणी | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | अ | ब | क | |
| ५वी | २ | १२ | ४ | १८ |
| ८वी | २ | २ | ३ | ७ |

**शाळेतील प्रथम क्रमांकाचे विद्यार्थी :**

| इयत्ता | विद्यार्थ्यांचे नाव | गुण | श्रेणी |
|---|---|---|---|
| ५वी | अंकुर नाडकर्णी | ९० | अ |
| ५वी | अस्मी गोरे | ९० | अ |
| ८वी | श्रीया दरेकर | ९६ | अ |
| ८वी | सिद्धार्थ वेर्णेकर | ९६ | अ |

**सुरवाणी ज्ञान मंदिर व दिनदयाळ केंद्रातर्फे घेतलेल्या 'संस्कृत श्लोक पठण' स्पर्धेचे निकाल :**

१) सार्थक कुलकर्णी – छोटा वर्ग – प्रथम क्रमांक

२) श्रीया कोल्हटकर – मोठा वर्ग – दुसरा क्रमांक

३) मोहा कुलकर्णी – मोठा वर्ग – उत्तेजनार्थ

**स्त्री कल्याण संघटनेतर्फे घेतलेल्या मराठी वक्तृत्व स्पर्धेचे निकाल :**

१) यशश्री दाभोळकर – गट क्र. ५ – प्रथम क्रमांक

२) मोहा कुलकर्णी – गट क्र. ७ – प्रथम क्रमांक

**क्रीडा – DSO तर्फे घेतलेल्या विविध स्पर्धेत आमच्या विद्यार्थ्यांनी खालील पारितोषिके मिळवली :**

**१) जलतरण–**

अ) ओंकार राऊतने ५० मी. फ्री–स्टाईल, १०० मी. फ्री–स्टाईल व ५० मी. बॅक स्ट्रोकमध्ये सुवर्णपदक मिळवले.

(ब) नेत्रा भट ने ५० मी. फ्री–स्टाईल, १०० मी. फ्री–स्टाईल व २०० मी. फ्री–स्टाईल मध्ये सुवर्णपदक मिळवले.

२) कराटे – चैत्राली शिरसाटने तालुका पातळीवर रजत पदक मिळवले.

३) ताक्वांदो – श्रेयस महाजन याने कांस्यपदक मिळवले.

४) स्केटिंग – आदिती मांडवकर हिने रजत पदक मिळवले व विभागीय पातळीवर आपले स्थान निश्‍चित केले.

५) आर्चरी – जान्हवी बेडेकर हिला सुवर्ण पदक मिळाले व मुंबई विभागात आपले स्थान निश्‍चित केले.

६) लॉन टेनीस – तन्वी गद्रेने तालुका पातळीवर पाचवे स्थान मिळवले व मुंबई विभागात आपले स्थान निश्‍चित केले.

७) चेस – सोहम कुंटेने मुलांच्या U17 गटात पाचवे स्थान मिळवले व समर्थ पंडितने मुलांच्या U14 गटात चौथे स्थान मिळवले.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

**इ–कचरा संकलन मोहीम संपन्न**

इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा कचरा ही सर्वांनाच सतावणारी समस्या आहे. याकरिता मदतीचा हात पुढे करून विद्या प्रसारक मंडळाचे बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातर्फे इ–कचरा संकलन मोहीम दि. २२ ऑगस्ट २०१७ रोजी आयोजित करण्यात आली होती. या आधी देखील दि. ३० जानेवारी २०१७ रोजी इ–कचरा संकलन मोहीम महाविद्यालयातर्फे संपन्न झाली होती.

या मोहीमेला महाविद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर सहकारी यांनी प्रतिसाद दिला व मोबाईल चार्जर, बॅटरीज, संगणक, प्रिंटर, फ्रिज, टीव्ही, माउस, किबोर्ड, सीडी, इलेक्ट्रिक वायर्स इत्यादी विविध प्रकारे जवळपास १२२० किलो इ–कचरा जमा झाला होता.

महाविद्यालयाच्या पर्यावरण शास्त्र विभागाच्या व राष्ट्रीय छात्र सेना (NCC) विद्यार्थ्यांनी या मोहिमेत फार मोलाचे कार्य बजावले. वरील सर्व इ–कचरा जमा करून नोंद करण्याचे आणि विभागून ठेवण्याचे काम हे विद्यार्थी करत होते.

९ खाजगी कंपन्या आणि संस्था, ०३ शैक्षणिक संस्था आणि १७ जणांनी व्यक्तीगत पातळीवर इ–कचरा जमा करून या मोहिमेत सहभाग घेतला. १२ शैक्षणिक संस्था व १७ वैयक्तीक सहभागात १२२० किलो. म्हणजे जवळ जवळ सव्वा टन इ–कचरा गोळा केला.

**संस्कृत दिवस समारोह**

संस्कृत दिवस मंगळवार, २२ ऑगस्ट २०१७

रोजी पार पडला. हा कार्यक्रम बांदोडकर विज्ञान महाविद्यालय आणि संस्कृत भारती यांच्या संयुक्त विद्यमाने साजरा झाला. या कार्यक्रमाला डॉ. सौ. परिणिता देशपांडे प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या होत्या. संस्कृत भारतीचे श्री. नारायण, सौ. प्रज्ञा खासनीस हे कार्यकर्ते उपस्थित होते.

या कार्यक्रमात महाविद्यालयाच्या ११ वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांनी अनेक कार्यक्रम सादर केले. सूत्रसंचलनापासून ते आभारप्रदर्शनापर्यंत सर्व काही विद्यार्थ्यानीच उत्तमरित्या पार पाडले.

कार्यक्रमाची सुरवात गणनायका या गणेश वंदने पासून झाली. त्यानंतर पार्वती लक्ष्मी संवादाने प्रेक्षकांमध्ये विनोदाचे वातावरण निर्माण केले. लावणी हा प्रकार सर्वश्रुतच आहे. पण तीच लावणी संस्कृत मध्ये सादर केली तर ...... हो ! इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांनी 'नटरंग' सिनेमा मधील 'वाजले की बारा' ही प्रसिद्ध लावणी संस्कृतातून सादर केली. तसेच 'सुरससुबोधा विश्वमानोजा' हे संस्कृत भाषेची माहिती, भाषेचा गोडवा सांगणारे गीत देखील विद्यार्थ्यांनी सादर केले. त्याचबरोबर संस्कृत साहित्याची माहिती सांगणाऱ्या कालिदास, वाल्मिकी, पाणिनी आणि कौटिल्य या ग्रंथकारांवर विद्यार्थ्यांनी संस्कृत भाषेमधून भाषण केले. विशेष म्हणजे ही भाषणे त्यांनी स्वतःच संस्कृतमधून लिहिली होती. हे विज्ञान महाविद्यालय असल्याने १० विद्यार्थ्यांनी १० विज्ञानपर सुभाषिते उपस्थितांसमोर सादर केली.

या पूर्ण कार्यक्रमानंतर मान्यवरांनी आपल्या भाषणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. संस्कृत भाषा ही संस्कृतमधूनच शिकवली जावी अशा निग्रहाने मॅडमनी संपूर्ण भाषण हे संस्कृतमधूनच केले. संस्कृत भाषेवर भारताचे भवितव्य अवलंबून आहे. या आशयाचे मॅडमनी व्याख्यान दिले.

**हिंदी दिवस उत्साहात पार पडला.**

हिंदी दिवसाचे आयोजन १४ सप्टेंबर रोजी प्रमुख पाहुणे गझल सम्राट गझलकार प्रा. हनिफ शेख यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी महाविद्यालयाचे हिंदी विभाग प्रमुख प्रा. अनिल आठवले यांनी ११ वी च्या विद्यार्थ्यांच्या मार्फत वेगवेगळ्या कार्यक्रमांचे नियोजन केले. १२ वीचा विद्यार्थी आदर्श दुबे यांनी हिंदी दिवसाचे महत्त्व सांगून प्रेक्षकांची मने जिंकली. त्याने केलेल्या भाषणाने संपूर्ण सभागृहात उत्साहाचे वातावरण पसरले.

इतकेच नाही तर कुमारी धुमाळ या विद्यार्थिनीने काका हाथरसी यांची कविता सादर करून टाळ्यांचा कडकडाट घेतला. राष्ट्रीय एकात्मता दाखविणारे मुक अभिनय नृत्य साक्षी और साथियाने अत्यंत सुंदर पद्धतीने हिंदू, मुस्लीम, शिख, इसाई यांच्या मध्ये ऐक्य दाखवून आपण सारे भारतीय आहोत हे त्यांच्या कलाकृतीतून अत्यंत लक्षभेदी पद्धतीने सादरीकरण करून भारताविषयीचे आदर, प्रेम जागृत केले. तसेच आजही भारतात अशिक्षित पणा दिसून येतो त्यासाठी 'शिक्षा का महत्त्व' या विषयावर आधारीत नाटीका सादर केली व त्यातून गावातील मुलींना शिक्षण न दिल्याने पित्याची होणारी हेळसांड, त्यातून पित्याने घेतलेला धडा आणि शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. आणि या नाटकांमधून 'बेटी पढाओं और देश को आगे बढाओ' हा संदेश दिला.

कार्यक्रमाचे सुंदर स्वरूप व आखणी पाहून प्रमुख पाहुण्यांनी हिंदी विभाग प्रमुखांचे अभिनंदन केले व विद्यार्थ्यांनी केलेल्या कार्यक्रमांतून प्रभावित झाले. हिंदी दिवसा बद्दल बोलताना ते म्हणाले की, हिंदी एकदम सिदी सरळ भाषा आहे. तिच्यातून आम्ही घडलो. भाषा हीच आमची ताकद आहे, भाषा हीच आमची संस्कृती आहे, भाषा हीच आमची आपुलकी आहे. विद्यार्थ्यांच्या कलाकृतीने प्रभावित झालेल्या पाहुण्यांनी

केवळ सायन्स असणाऱ्या महाविद्यालयात हिंदी दिवस उत्साहात साजरा होतो याचं खूप कौतुक त्यांना वाटलं आणि त्यांनी महाविद्यालयाचे कौतुक केले आणि अतिशय सुंदर आवाजात गझल गाऊन वातावरण मंत्रमुग्ध केले. हिंदी दिवसाविषयी बोलताना ते म्हणाले की, 'आपण सर्वांनी हिंदी तर बोललीच पाहिजे. पण आपल्या जन्मदात्या मातृभाषेला विसरले नाही पाहिजे. हिंदी ही आपली राष्ट्रभाषा आहे. तिचा सन्मान, अभिमान आपण बाळगला पाहिजे.'

प्रा. प्रकाश माळी यांनी कविता, शायरी यांनी वातावरणात हस्याचा खळखळाट केला. या कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**'हृदयाच्या आरोग्यासाठी' एक हृदयस्पर्शी व्याख्यान**

आजचे स्पर्धात्मक जग, धावपळीचे आयुष्य, आहारविहाराच्या चुकीच्या समजुती, ताणतणाव, अपुरी झोप, वाढती व्यसनाधीनता आणि परिणाम, वाढत जाणारे वजन या सर्वांच्या पार्श्वभूमीवर 'जागर जाणिवां'च्या अभियानांतर्गत व NSS व NCC यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर सहकारी यांच्यासाठी CARDIAC RISK ASSESSMENT PREVENTION यावर माधवबाग ठाणे यांच्यातर्फे प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. प्रसाद देशपांडे यांचे माहितीपर व्याख्यान पतंजली सभागृहात आयोजित केले होते.

BODY MASS INDEX (BMI) म्हणजे काय? किती तास SOUND SLEEP ची शरीराला गरज असते? रक्तवाहिन्यातील BLOCKAGES म्हणजे हृदयरोग का? ANGIOPLASTY म्हणजे काय?, BY-PASS SURGERY म्हणजे काय?, हृदयरोगाचा झटका (ATTACK) येतो म्हणजे नक्की काय होतं? इथपासून सुरू होणारे हे डॉ. देशपांडे यांच्या व्याख्यान आहारातील साखर बंद करावी, गुळाचा वापर करावा, चपातीच्या म्हणजेच गव्हाच्या ऐवजी बाजरीचा वापर करावा, भात टाळावा, पावसाळ्यामध्ये दही टाळावे, दुग्धजन्य पदार्थ मर्यादित ठेवावीत, कर्बोदूकांचा कमीतकमी वापर आहारात करावा. कारण त्यामुळेच हृदयावर अतिरिक्त ताण येतो. STRESS TEST पेक्षा तणावविरहित जीवन जगावे, रोज फक्त दहा मिनिटे ध्यानस्थ बसावे, थोडा व्यायाम व थोडे पथ्यपाणी पाळावे तर नंतरच्या सर्व TEST आणि शस्त्रक्रियांची गरज भासणार नाही. MEDITATION आणि प्राणायाम याचा समावेश रोजच्या दैनंदिन जीवनात केल्यास हृदयातील ऑक्सिजनचे प्रमाण नेहमीच चांगले राहील व पुरेशी झोप आणि समतोल आहार घेतल्यास कोणत्याही कोलेस्ट्रोलची वाढ हृदयात होणार नाही व सर्वांचेच हृदय योग्य चांगले राहण्यास मदत होईल. PREVENTION IS BETTER THAN CURE असे वैद्यकशास्त्रात म्हटले आहे.

वाचन लक्षात ठेऊन आपण हृदयरोग होऊन न देणे हे सर्वात चांगले, तसेच ज्या गोष्टींमध्ये बदल घडविणे शक्य आहे म्हणजे पोटावरील FAT कमी करता येईल, टाळता येतील. आहार पद्धतीमध्ये बदल करता येतील, आपली रोजची जीवनशैली बदलता येईल. शांत व स्पर्धाशून्य आयुष्य जगता येईल इत्यादी गोष्टींवर डॉ. देशपांडे यांनी ऊहापोह केला.

नौपाडा ठाणे येथील 'माधवबाग' या HEART CARE संस्थेच्या प्रतिनिधी वैशाली बागडे या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी. त्यांच्या मार्फत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी या व्याख्यानाचे आयोजन केले होते. कारण शिक्षकेतर सहकाऱ्यांमध्ये अनेक जण OVERWEIGHT किंवा BMJ हा HIGH SCALE वर असणारे असतात म्हणून शिक्षक व शिक्षकेतर सहकाऱ्यांसाठी या विशेष व्याख्यानाचे आयोजन केले होते.

---

सर्वात शहाणपण कोणाला असेल तर ते काळाला; तोच सर्व गोष्टी प्रकट करतो! - थेल्स

## जपानी विद्यार्थी रंगले मंगळागौरिच्या खेळात

विद्या प्रसारक मंडळ आणि क्योटो सांग्यो विद्यापीठ, क्योटो, जपान या दोन संस्थांमध्ये सांस्कृतिक आदान प्रदान प्रकल्प राबविण्यासाठी एक सामंजस्य करार करण्यात आला आहे. या कराराअंतर्गत २०१२ पासून दरवर्षी ऑगस्ट-सप्टेंबर दरम्यान दोन आठवड्यांसाठी या विद्यापीठाचे १५ विद्यार्थी विद्या प्रसारक मंडळाच्या शैक्षणिक संकुलात १५ दिवस भारतीय संस्कृती विषयक विविध शिक्षण घेतात. या अभ्यासक्रमाअंतर्गत या विद्यार्थ्यांनी हिंदी भाषा, इंग्रजी, योगाभ्यास, विविध सांस्कृतिक खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, विविध सण, उत्सव, ऐतिहासिक वारसा, शैक्षणिक सहली इत्यादी विषयांवर अभ्यास करीत असतात.

याच उपक्रमांतर्गत संयोजक डॉ. क्यूओकोनी शिगा व डॉ. सुधाकर आगरकर हे १५ जपानी विद्यार्थ्यांच्या समवेत बांदोडकर महाविद्यालयाच्या सांस्कृतिक मंडळाने आयोजित केलेल्या मंगळागौर कार्यक्रमामध्ये प्रत्यक्ष सहभागी झाले. या कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती वंदना सादर करून झाली. त्यानंतर 'गणेश वंदना' यावर बांदोडकर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले. महाविद्यालयाच्या कार्यालयीन व प्रयोगशाळेच्या कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेऊन मंगळागौर कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमाचे सादरीकरण होत असताना बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर या कार्यक्रमाबद्दल भाषांतरित करून जपानी विद्यार्थ्यांना समजावून सांगत होत्या. तसेच त्यांनी व कार्यालयीन सहकाऱ्यांनी मंगळागौर व भोंडला कार्यक्रमाची गाणी सादर केली. कार्यालयातील श्री. चेतन यांनी बाल्या नृत्य मध्ये जपानी पाहुण्यांना सहभागी करून मजा आणली व भोंडल्याची गाणी व खेळगाणी प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर, सौ. शामल कुलकर्णी, सौ. पद्मजा नामजोशी यांनी आपल्या संपूर्ण जोशात व ठेक्यात म्हटली. झिम्मा, फुगडी, त्रिफुला, चौफुला, उठबस फुगडी,पिंगा अशा एकापेक्षा अनेक जुन्या परंपरेतील खेळ व गाणी या जपानी विद्यार्थ्यांनी स्वतः सहभागी होऊन जिवंत केली. यावेळी सांस्कृतिक समन्वयक डॉ. प्रा. प्रकाश माळी व समितीमधील प्रा. रोहिणी डोंबे, प्रियांका कोळी, श्रावणी कुडापणे, श्यामल कुलकर्णी, अश्विनी कोळी इत्यादी शिक्षक व शिक्षकेतर सहकाऱ्यांनी मेहनत घेऊन स्वतःच या 'जपानी मंगळागौर' चे नृत्यदिग्दर्शन केले.

## माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन

महाविद्यालय हे १९७६ सालापासून ठाणे शहरात विज्ञान शाखेतील एकमेव महाविद्यालय म्हणून सर्वांना परिचित आहे. या महाविद्यालयतून पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी आज भारतात व भारता बाहेर मोठ्या पदांवर कार्यरत आहेत.

या विद्यार्थ्यांचे आपल्या महाविद्यालयाशी नाते अखंड राहावे ह्या उद्देशाने सर्व माजी विद्यार्थ्यांची अनुबंध ही संघटना आहे.

बांदोडकर महाविद्यालयाच्या सर्व माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन १० सप्टेंबर २०१७ रोजी पतंजली सभागृहात आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाची सुरवात महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य डॉ. आर.पी. आठल्ये ह्यांनी महाविद्यालयाकरिता रचलेल्या बांदोडकर गीताने झाली व डॉ. प्रकाश माळी व कु. पल्लवी गुलाखे ह्या दोघांनी सर्वांसमोर सादर केले. महाविद्यालयाच्या स्थापनेपासून ते सद्यस्थिती असा प्रवास व्हिडीओच्या मध्यामातून मांडण्यात आला. सध्या महाविद्यालयात शिकत असलेल्या सौरभ बरकडे ह्या विद्यार्थ्याने हा व्हिडीओ तयार केला होता. तो पाहात असताना उपस्थितांच्या जुन्या आठवणी ताज्या झाल्या.

---

काळ हा सर्व गोष्टी विसर्जित करून त्यांना जीर्ण करून टाकतो.

ह्या व्हिडीओच्या माध्यमातून महाविद्यालयाच्या उन्नतीचा प्रवास डॉ. कल्पिता मुळ्ये, विभाग प्रमुख, जैवतंत्रज्ञान विभाग ह्यांनी आपल्या गोड आवाजात मांडला.

स्वपरिचयापासून सद्यस्थितीत कोण कोठे कोणत्या पदावर कार्यरत आहेत इथपासून ते माझ्या परीने मी माझ्या संस्थेला कोणती मदत करू शकतो? इथपर्यंत संवाद घडले. ह्यावेळी माजी विद्यार्थी पूजा म्हात्रे हिने महाविद्यालयाच्या आठवणीची एक कविता सादर केली. ह्या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे आजी व माजी शिक्षक देखील उपस्थित होते. व मराठी चित्रपट व नाट्यदिग्दर्शक विजू माने यांनी 'मनातलं काही, काहीही.' ही हलकी फुलकी एकपात्री दिर्घांकिका सादर करून सर्वांच्याच जुन्या आठवणी, तोच बेंच, तोच कट्टा, तेच नारळाचे झाड, तेच Hollywood, तीच प्रयोगशाळा, त्याच आणाभाका, तीच नाटके, तेच Class bunking, तीच मारलेली थाप आणि सर्व काही अजूनही तेच तसेच असल्याचा भास आणि आभास या सुंदर अभिनय, अभिवाचन व नाट्यछटांमधून घडवून आणला व सर्वांचीच वाहवा मिळविली. त्यांना साथसोबत केली ती डॉ. प्रा. प्रकाश माळी यांनी.

महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांत माजी विद्यार्थी सहभाग घेतात व संस्थेप्रती आपले ऋण आहेत, ह्या संस्थेसाठी काहीतरी करावे ही त्यांची धडपड आहे. असेच माजी विद्यार्थी डॉ. प्रसाद कर्णिक, प्रमुख मुंबई विद्यापीठ, ठाणे उपकेंद्र, श्री. अभय मराठे, श्री गिरीश तिळवे ह्यांनी महाविद्यालयाकरिता करत असलेल्या त्यांच्या उपक्रमाबद्दल अनुभव व्यक्त केले.

महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. सी.जी. पाटील यांनी ह्यावेळी आपले अनुभव येथे मांडले व प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी माजी विद्यार्थी विविध प्रकारे महाविद्यालयातील कार्यक्रमात सहभागी होऊन आपली मोलाची भूमिका बजावू शकतात याबाबत थोडक्यात मार्गदर्शन केले व संपूर्ण कार्याक्रमाचे सूत्रसंचालन १९९५ सालचे माजी विद्यार्थी श्री. पुष्कर तांबे ह्यांनी अतिशय हुमजदार शैलीत केले.

महाविद्यालायचे उपप्राचार्य श्री. व्यंकटरमन यांनी ह्यावेळी आभार प्रदर्शन केले. तसेच महाविद्यालयात काम केलेल्या व आता हयात नसलेल्या शिक्षकांना श्रद्धांजली म्हणून १ मिनिटं मौन राखले गेले व या गत आठवणींना उजाळा देणाऱ्या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. ह्यावेळी २०९ माजी विद्यार्थी व ४ माजी शिक्षक उपस्थित होते.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

१७ सप्टेंबर, २०१७ रोजी निवृत्त न्यायाधीश राधाकृष्णण यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या तुरुंग सुधार समितीची महत्त्वाची बैठक घेण्यात आली होती. यासाठी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार, प्राध्यापक विनोद वाघ व २५ विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी विधी महाविद्यालयाची तुरुंग सुधार बद्दलची जबाबदारी या विषयावर चर्चा करण्यात आली.

२२ सप्टेंबर, २०१७ रोजी भायखळा येथील कार्यालयात तुरुंग विभागाचे महाअधिक्षक राजवर्धन व मुंबई व ठाणे मधील सर्व तुरुंगांच्या अधिक्षकांसोबत बैठक घेण्यात आली. या बैठकीसाठी महाविद्यालयाच्या विधी सहाय्यता केंद्राचे प्रभारी प्रा. विनोद वाघ हजर होते.

दिनांक ८ सप्टेंबर रोजी महाविद्यालयाच्या विधी सहाय्यता केंद्राच्या माध्यमातून, तसेच ठाणे जिल्हा विधी सेवा केंद्र यांच्या माध्यमातून ठाणे न्यायालयाच्या प्रांगणात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. पत्रकारांनी लोक-अदालतीच्या माध्यमातून

प्रलंबित दावे व खटले लवकर संपवावे हा त्यामागचा प्रमुख उद्देश होता.

दिनांक ६ सप्टेंबर रोजी जपानच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयास भेट दिली. यावेळी विधी विद्यार्थ्यांनी त्यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करून त्यांना भारतीय पाककलेचे, तसेच मेहंदी व रांगोळीचे दर्शन घडवले. यावेळी त्यांना महाविद्यालयाविषयी थोडक्यात माहिती देण्यात आली.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

**!! अभिनंदन !!**



**विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक यांना पीएच.डी. पदवी प्रदान.**

देशातील प्रसिद्ध 'वीर जिजामाता टेक्निकल इन्स्टिट्यूट, मुंबई' या अग्रगण्य संस्थेकडून विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे चे प्राचार्य दिलीपकुमार कृष्णा नायक यांना 'इलेक्ट्रोनिक्स इंजिनिअरिंग' मध्ये नुकतीच पीएच.डी. (Doctor of philosophy) पदवी प्रदान करण्यात आली.

'Hydrogen Storage Studies of Ammonia Borane' ह्या विषयावर प्रबंध त्यांनी सादर केला होता.

डॉ. एच. ए. मंगलवेढेकर ( प्रोफेसर, इलेक्ट्रीकल इंजिनिरिंग VJTI, मुंबई ) व डॉ. एस. के. महाजन (सह-संचालक तंत्रशिक्षण, महाराष्ट्र शासन) यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले.

•••

(पृष्ठ क्रमांक ११ वरून - **आठवणीतले पी. सावळाराम**)

निधनानंतर ग. दि. माडगुळकर पुरस्कार देण्यात आला. नाट्य परिक्षण मंडळाचे परीक्षक सदस्य म्हणून १२ वर्ष काम केले. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य गृह निर्माण मंडळाचे सदस्य म्हणूनही त्यांनी काम केले. तसेच आपल्या विद्या प्रसारक मंडळाचे त्यांनी उपाध्यक्ष म्हणूनही काम केले.

१९६६-६७ या वर्षभराच्या काळात सावळारामांनी ठाण्याचे नगराध्यक्षपद भूषविले. एक कवी नगराध्यक्ष होऊ शकतो या बद्दल आचार्य अत्रेंना खूप आनंद झाला. त्यांनी सावळारामांचे कौतुक केले होते. वारकरी पंथाचे, सरळ स्वभावाचे, स्वच्छ मनाचे सावळाराम दोन खोल्यांच्या भाड्याच्या घरात राहात होते.

या मान्यवर कविचा मित्रांचा गोतावळा मोठा होता. सरकारी दरबारी ओळखीही खूप होत्या. सामाजिक कार्यात अनेक ठिकाणी त्यांचा सिंहाचा वाटा होता. आजच्या ठाण्याच्या कॉलेजची ३.५ एकर जागा त्यांना विनामूल्य मिळवून दिली. अनेक लोकांची अगणित कामे स्वतःचा कोणताच फायदा न पाहता करून दिली. अशा या लोकप्रिय कविला शतशः प्रणाम.

शब्दांकन :
**सौ. ज्योती केदारे**
डॉ. बेडेकर विद्या मंदिर, ठाणे

•••

*दिशा संपर्क दूरध्वनी*
**०२२-२५४२ ६२७०**

(पृष्ठ क्र. २ वरून - **संपादकीय)**

नेमणूका, त्यांचे पगार, परीक्षा, सुट्ट्या इ. सगळ्या गोष्टी या सरकारी नियंत्रणाखाली आहेत. यात भर आहे ती वाढत जाणाऱ्या 'आरक्षणा'ची.

ब्रिटिशांनी भारताला दिलेली सर्वात मोठी देणगी ही भारतीय शिक्षणाच्या सरकारीकरणाची आहे.

ज्या मध्ययुगीन किंवा प्राचीन भारतीय शिक्षणानी भारतीय व्यापार, आणि उद्योगांना जगभर पोहचवले ती भारतीय शिक्षणप्रणाली संपूर्णपणे उध्वस्त करूनच, चार भिंतीमधील सरकारी नियंत्रणाखालील शिक्षणपद्धती १९ व्या शतकाच्या सुरुवातीपासून या देशात ब्रिटिशांनी लागू केली. 'ब्रिटिशपूर्व' भारतीय शिक्षण पद्धतीबद्दल अनेक गैरसमज आजही आपल्या विद्वानांमध्ये प्रचलित आहेत. धरमपाल यांचे The Beautiful Tree (1983) आणि जोसेफ डिकोनांनी संपादित केलेले One teacher one school या पुस्तकांनी या विषयाचा साधार ऊहापोह केला आहे. शिवाय बनारस येथील 'पंडित' शिक्षणावरही आज अनेक अभ्यासपूर्ण संशोधन निष्कर्श उपलब्ध आहेत. भारतीय शिक्षणपद्धत पद्धतशीरपणे बंद करून इंग्रजी शिक्षणाची उभारणी कशी केली गेली याचे वर्णन या निबंधांमधून विस्तृतपणे मांडण्यात आले आहे.

भारत हा मागासलेला, अंधश्रद्धांनी भरलेला देश असून त्याला सुसंस्कृत करायचे असेल तर त्याला ख्रिस्ती करणे आवश्यक आहे या विचारांनी प्रभावित झालेले धर्म-प्रसारक, आणि ईस्ट इंडिया कंपनीचे नोकरशहा यांनी भारतीय शिक्षण पद्धतीला सुरूंग लावण्याचे कारस्थान १९ व्या शतकाच्या दुसऱ्या दशकापासून हिरीरीने चालू केले. मेकॉले (T. B. Macalay, 1800-1859) आधीच चार्ल्स ग्रँट (Charles Grant, 1746-1823), विल्यम विल्बरफोर्स (William Wilberforce, 1769-1833), विल्यम हॉज मिल (William Hodge Mill - 1792-1853), विल्यम कॅरे (William Carey, 1767-1837), जॉन मूर (John Muir, 1810-1882), विल्यम वॉर्ड (William Ward, 1769-1823) इ. सर्व धर्मप्रसारकांचे भारताबद्दल हेच मत होते आणि धर्मप्रसाराबरोबरच शिक्षण प्रसाराचे कामही ते करत असत. पाश्चात्य शिक्षण पद्धतीचा भारतामध्ये मेकॉले आधी यांनी पाया घातला होता असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. मॅकॉलेच्या अहवालामुळे या प्रयत्नांना राजमान्यता मिळाली.

१७६५ला इंग्रजांना बंगाल प्रांताची दिवाणी मिळाली, आणि खऱ्या अर्थाने इंग्रजांच्या वसाहतवादाला सुरुवात झाली. शेतसाऱ्यापासून न्यायदानाचे सगळे अधिकार ईस्ट इंडिया कंपनीने आपल्या ताब्यात घेतले. त्याकरता अधिकारी वर्गाच्या नेमणूका व्हायला लागल्या. शिक्षण पद्धतीमधील बदल हा त्याचीच पुढची पायरी होती. भारताचे साहित्यापासून, विज्ञानापर्यंत मागासलेपणाचे चित्र रेखाटण्याचे काम याकरताच धर्मप्रसारकांच्या मदतीने हाती घेण्यात आले होते. या सगळ्या इतिहासाचा ऊहापोह येथे घेता येणे शक्य नसले तरी, इंग्रजी शिक्षणाचा पाया भारतात कसा घातला गेला याच्या काही टप्प्यांची नोंद घेणं मात्र आवश्यक आहे.

१८८३ साली मॅक्स मुल्लरनी 'India, What can it teach us' हे त्याच्या भाषणांवर आधारित पुस्तक प्रकाशित केले. त्या पुस्तकातील भारतीय शिक्षणावरील त्याची टिप्पणी बोलकी आहे,

"There is such a thing as social education and education outside of books, and this education is distincltly higher in India than in any part of Christendom. Through recitation of ancient stories and legends, through religions songs and passion play, through shows and pagents, through ceremonials and sacraments, through fairs and pilgrimages, the Hindu masses all over India receive a general culture and education

which are in no way lower, but positively higher, than the general level of culture and education received through schools and newspapers or even through the ministration of the churches in western christian lands. It is an education, not in the so-called three R's, but in humanity."

याचप्रमाणे विल्यम जोन्स यांनी स्थापन केलेल्या बंगालच्या एशियाटीक सोसायटीच्या माध्यमातूनही भारताच्या साहित्यापासून वनस्पतीशास्त्राच्या विकासाची माहिती इंग्रजांना मिळतच होती. अर्थातच यामुळे भारताच्या धर्मविचारापासून विज्ञानापर्यंत एका प्रगत, सुसंस्कृत सभ्यतेचे चित्र उभे राहात होते. अर्थातच ख्रिस्ती धर्मप्रसारक किंवा मेकॉलेला हे काहीच मान्य नव्हते.

धर्मप्रसारकांना हेच चित्र बदलायचे होते. त्यांना सर्व भारत ख्रिस्ती करायचा होता. त्याकरता त्यांनी हिंदूधर्मातील वैग्युण्यांवर भर द्यायला सुरुवात केली. भारतीयांच्या धर्मकल्पनेला मूठमाती द्यायची असेल तर पाश्चिमात्य विज्ञानाचे श्रेष्ठत्व पटवून देणे महत्त्वाचे होते. अर्थात ही गोष्ट सोपी नव्हती. 'पंडित' परंपरा आणि रयतेचा धर्मावरील ठाम विश्वास यांना शिक्षणाच्या माध्यमातून सुरूंग लावल्याशिवाय हे शक्य नाही हे या धर्मप्रसारक आणि नोकरशहांच्या लक्षात आले होते.

खऱ्या अर्थाने भारतीय शिक्षण पद्धती बदलून इंग्रजी माध्यम आणि पाश्चिमात्य शिक्षण पद्धतीची सुरुवात बनारस म्हणजेच काशीपासून झाली.

बनारस हे धर्मसंस्था आणि विद्येकरता प्रसिद्ध होते. मोठ्या प्रमाणावर पंडित तिथे राहत होते, आणि पाठशाळांचे जाळे बनारसमध्ये होते. विल्यम वॉर्ड यांनी १८१८ मध्ये प्रकाशित केलेल्या आपल्या पुस्तकात ८० पंडित आणि १४०० हून अधिक विद्यार्थ्यांची नोंद केलेली आढळते. व्याकरण, दर्शने, धर्मशास्त्राप्रमाणेच १४ विद्यांचेही शिक्षण तिथे दिले जात असल्याची नोंद त्यांनी केली आहे. (A view of the History, Literature and Mathology of the Hindoos: including a minute description of their manners and customs, and translations from their pricipal works. 3 Volms, 1818) वॉर्डने नमूद केल्यापेक्षा कितीतरी जास्त पाठशाळा बनारसमध्ये होत्या. थॉर्नटन (Thornton) या दुसऱ्या अभ्यासकाने १८५० मध्ये १९३ पाठशाळा आणि १९०० हून अधिक विद्यार्थ्यांची नोंद केली आहे.

पाठशाळेचे शिक्षणातील महत्त्व लक्षात घेऊन १७९१ साली पहिले संस्कृत महाविद्यालय इंग्रज सरकारच्या आधिपत्याखाली बनारसला चालू झाले. या बनारस संस्कृत महाविद्यालयाचा इतिहास म्हणजेच भारतीय शिक्षण पद्धतीला आमुलाग्र बदलून, तेथे इंग्रजी माध्यम आणि पाश्चिमात्य शिक्षण पद्धतीच्या परिवर्तनाचा इतिहास आहे. याची सुरुवात संस्कृत शिक्षणाने झाली असली तरी टप्प्याटप्प्याने बदल करत १८५० पर्यंत हा बदल जवळजवळ पूर्ण झाला होता. इंग्रजांच्या आधिपत्याखाली आलेल्या बंगाल, मुंबई आणि मद्रास प्रांतामधून कमी-अधिक प्रमाणात हीच परिस्थिती होती.

भारतीय शिक्षण पद्धतीची रचना ही फक्त 'पंडिती' शिक्षणाची नव्हती. बहुसंख्य समाज आपल्या परंपरागत व्यवसायातील 'कौशल्ये' घरातूनच मिळवत असे. प्रत्यक्ष व्यवसाय आणि कृती यातूनच तो आपले शिक्षणकौशल्य विकसित करत होता. शिवाय त्याच्या इतर सांस्कृतिक आणि व्यक्तिमत्त्व विकासाकरता समाज व्यवहारातूनच त्याला ते शिक्षण मिळत होते. मॅक्सम्युलरने याचेच अत्यंत सुंदरपणे केलेले वर्णन आपण वर बघितले आहे. शिक्षणाच्या या व्यापकतेची संकल्पना त्यावेळच्या ब्रिटिश धर्मप्रसारक आणि सरकारी अधिकाऱ्यांना आली नाहीच, पण आजच्या भारतातील अनेक विद्वानांनाही त्याचे आकलन होत नाही. भारतीय शिक्षण व्यवस्था आणि त्याची समाज व्यवस्था म्हणजे वर्णाश्रम धर्म

याचे अतूट नाते होते. या दोन्हीही व्यवस्था एकमेकांना पूरक होत्या.

पाठशाळेमधील 'गुरू' आणि त्यांचे 'विद्यार्थी' यांचे अभ्यासक्रम, ज्ञानदानाची पद्धत ही संपूर्णतया भिन्न होती. बनारस संस्कृत विद्यापीठामध्ये या बदलाला सुरुवात जी झाली ती सरकारी अनुदानानी. पंडिताला पगार मिळू लागला आणि विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती. याचा हेतू हा अर्थातच दोघांमध्येही परालंबित्व आणणे हाच होता. सुरुवातीची काही वर्षे तेथील शिक्षण पाठशाळेसारखेच होत असले तरी टप्प्याटप्प्याने त्याचे इंग्रजीकरण चालू झाले. परंपरागत शिक्षणात गुरूला आपल्या विद्यार्थ्याला, त्याच्या क्षमता लक्षात घेऊनच शिकवायला लागत होते. त्यामध्ये लवचिकता होती, आणि त्यामध्ये बदल करण्याचा अधिकार त्या गुरुला होता. इंग्रजी शिक्षण पद्धतीला हे सगळे नवीन होते. अभ्यासक्रम, हजेरी, परीक्षा, मूल्यमापन इ. इंग्रजी शिक्षणाचा आधार असलेल्या गोष्टींचीही बनारस संस्कृत विद्यापीठामध्ये हळूहळू सुरुवात करण्यात आली. मायकेल डॉडसन यांनी आपल्या एका शोधनिबंधात याचे वर्णन खालीलप्रमाणे केले आहे,

"From the outset, the content of the 'traditional' curriculum taught at Benares Sanskrit College, as well as its method of transmission, continued to be wholly deremined by the pandits who instructed there, at least until the early 1840s".....

"On the other hand, the pandits and their students, unfamiliar with the structural changes contained within a move form 'traditional' methods of tuition in small, local pathsals to a centralize institution, integrated novelties such as compulsory altendance, attendence records, students' stipends and examinations into their own ways of understandings Sanskrit padagogy, often to the frustration of Britsih objective."

(Re-Presented for the Pandits : James Ballantyne. 'Useful knowledge', and Sanskrit Scholarship in Benares College during the Mid-Nineteenth Century, by Michael S. Dodson, *Modern Asian Studies*, Vol.36, No.2 (May 2002) pp 257-298.)

'शिक्षण पद्धतीमधील मुलभूत परिवर्तनाचे वर्णन यामध्ये आले आहे. इंग्रजी शिक्षणाचा मूळ हेतू हा हिंदूधर्मातील वैगुण्य अधोरेखीत करून भारतीयांना ख्रिश्चन करणे हाच होता. मेकॉलेनी हे धोरण स्पष्टपणे मांडले. त्यांना हाडामासाचे भारतीय पण विचार, संस्कृती आणि जीवनशैलीनी पाश्चिमात्य असे भारतीय, या शिक्षणपद्धतीतून निर्माण करायचे होते. बनारस संस्कृत विद्यापीठामधे त्याची अंमलबजावणी केली जात होती. परंपरागत शिक्षण हे निरुपयोगी, मागासलेले आणि इंग्रजी शिक्षण हे उपयुक्त आणि प्रगतशील (useful knowledge) हा या धोरणामागील हेतू आणि घोषवाक्य होते.

१८२९ साली कॅप्टन थॉर्सबी (Thoresby) यांनी एक अहवाल सादर करून संस्कृत महाविद्यालयामध्ये पर्शियन, अरेबिक अभ्यासाकरता एक मदरसा आणि इंग्रजी भाषा, आणि पाश्चिमात्य साहित्य आणि विज्ञानाच्या शिक्षणाकरता वेगळ्या इंग्रजी शिक्षणाची शाखा सुरू करावी, अशी शिफारस केली. सरकारने मदरसा चालू करायला जरी नकार दिला तरी, १९३० मध्ये याच महाविद्यालयांत इंग्रजी शिक्षणाची नवीन शाखा चालू झाली. सुरुवातीला वर्गात फक्त ३० विद्यार्थी होते. ग्रीक आणि रोमन इतिहास शिकवायलाही येथूनच सुरुवात झाली. १९३५ सालच्या मेकॉलेच्या अहवालानी या सगळ्याच प्रक्रियेमध्ये नवीन उत्साह आणला. १८३९ साली लॉर्ड ऑकलंड (Lord Auckland, 1784-1849) यानी आणखीन एक समिती नेमून, परंपरागत संस्कृत शिक्षणाला विराम देऊन, नवीन इंग्रजी शिक्षणाच्या अभ्यासक्रमाची बनारस कॉलेजमधील आवश्यकता पुन्हा एकदा आग्रहाने मांडली. त्यांच्या समितीमध्ये

एच. एच. थॉमस (H. H. Thomas) नावाचे एक विद्वान होते. हिंदू हे नीतीभ्रष्ट आहेत, आणि शिक्षणातील संस्कृतचे महत्त्व ताबडतोब कमी करावे या मताचे ते होते. त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर,

"The chilling apathy which is inherent in the native character, and is the result of deeply rooted superstition and gross ignorance, renders parents and guardians reckless of all suggestions for enlightening the rising generation."

Also in his Minute of March 1st 1839, he adds :

'To me the great utility of the Sanscrit never was apparent and its extensive cultivation under a British Government somewhat savours of absurdity. Better surely to promote the resuscitation of Persian and Arabic than to waste out time and money in preserving the mummy of this very dead language."

परंपरागत शिक्षणाची जागा इंग्रजी शिक्षणाने का घ्यायला हवी?, याची एवढी चांगली कारणमीमांसा शोधूनही सापडणार नाही!!

इंग्रजी शिक्षित पंडितांना हाताशी धरून १८५० पर्यंत बनारस संस्कृत विद्यापीठाचे परिवर्तन इंग्रजी माध्यमाबरोबरच, पाश्चिमात्य विज्ञान आणि संस्कृतीचे शिक्षण देणाऱ्या व्यवस्थेमध्ये यशस्वीपणे झाले होते. विल्कीन्सन पासून बॅलेनटाईन पर्यंत ख्रिस्ती धम-प्रसारकांनी सोइस्कर परंपरागत भारतीय विचार आणि संस्कृत माध्यम यांचा आग्रह धरला होता. या करता त्यांनी नवीन शिक्षण पद्धतीही निर्माण केली. पंडितांकरता पाठशाळा काढल्या, आणि त्याचबरोबर त्यांना पाश्चिमात्य विज्ञानाचे श्रेष्ठत्वही पटवून देण्याचा प्रयत्न केला. आजचे तथाकथित भारतीय शिक्षण हे बनारस संस्कृत विद्यापीठाच्या प्रयोगावरतीच उभे आहे. बनारस संस्कृत विद्यापीठामध्ये संस्कृत हा विषय शिकवला जात होता, परंतु त्याची संस्कृती मात्र पाश्चिमात्य करण्यात आली होती.

१८५३ साली जेम्स थॉमसन (James Thomson) यांनी बनारस संस्कृत महाविद्यालयाच्या नवीन इमारतीचे उद्घाटन केले. या इमारतीचे स्थापत्य हेही एखाद्या चर्च सारखेच आहे. आज तिथेच संपूर्णानंद संस्कृत विद्यापीठ उभे आहे.

स्वातंत्र्यानंतर आजपर्यंत भारतीय शिक्षणाचे सरकारीकरण आणि राजकीयीकरण अव्याहतपणे चालू आहे. त्यामध्ये 'आरक्षणा'ची नवीन भरच पडली आहे. 'संशोधन' किंवा 'दर्जा' या करता एक वेगळी मानसिकता आणि पायाभूत सुविधांची गरज असते. सृजनशीलतेची बीजे ही प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणातच रुजवावी लागतात; तेव्हा त्याची फळे उच्च शिक्षणात मिळतात. अनुदान, आरक्षण किंवा फुकटेपणाने त्याची निर्मिती होत नसते. भारतीय शिक्षणांतले प्रत्येक नवीन धोरण हे सरकारी नियंत्रणाच्या वेष्टनाने बांधून ठेवलेले आहे. शिक्षणाची यातून सुटका केल्याशिवाय संशोधनाची स्वतंत्र 'प्रतिभा' निर्माण होणे शक्य नाही. पाश्चिमात्य विद्यापीठ आणि भारतीय शिक्षण पद्धतीमधील बदल हाच आहे की, ती विद्यापीठे गेली कित्येक शतके 'स्वतंत्र' आहेत. मोदी यांच्या अनुदानामागील हेतू कितीही चांगला असला तरी तेही एक सरकारीकरणच आहे.

'संशोधन' आणि 'दर्जा' याकरता 'संपूर्ण स्वातंत्र्य' हाच एक उपाय आहे.

**- डॉ. विजय बेडेकर**

●●●

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- ❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.